। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २९२ वा । गुरूवार दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### इन्वेटरसह २,१४,००० किंमतीच्या मालाची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :फिर्यादी असीफ इसुफ शेख, वय २३ वर्षे, रा.शिवाजी चौक जुना रेणापुर नाका लातुर ह.मु. कल्पनानगर प्रायव्हेट लि. पुणे साइड यश मोटालिक्स प्रा. लि. बिड जवळगा ता. उमरगा जि. धाराशिव हे इंजिनियर म्हणुन काम करत असलेल्या सौरउर्जा प्रकल्पाचे इनव्हटर१५,१६,१७ चे इनव्हटर स्ट्रींग डिसी केबल २८०० मिटर अंदाजे २,००,००० किंमतीचे व कनेक्टर ४०८ नग असा एकुण २,१४,०००किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.२४.०१.२०२६ रोजी बेट शिवारातील फॉरेस्ट जवळील साइडवरुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-असीफ शेख यांनी दि.०१.०२.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव बसस्थानकातून मोबाईलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी - सिध्दांत दिपक राउत, वय २७ वर्षे, रा. रा. हरंगुळ लातुर ह.मु. विद्यानगर परळी मुख्यालय परळी जि. बीड यांचा अंदाजे १०,०००किंमतीचा मोबाईल फोन हा दि.०२.०२.२०२६ रोजी बसस्थानक धाराशिव येथे सिध्दांत हे धाराशिव लातुर बस मध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सिध्दांत राउत यांनी दि.०२.०२.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान धाराशिव शहर पोलीसांनी दि.०२.०२.२०२६ रोजी धाराशिव शहर पो ठाणे हद्दीत आडत लाईन धाराशिव येथे छापा टाकला. यावेळी अमर वय ४८ वर्षे, रा. देवळाली, अमोल राजेंद्र तट, वय ४५ वर्षे, राजु वय ४० वर्षे, दोघे रा. पापनाश नगर धाराशिव, बाबु वय ३५ वर्षे, रा. जना बस डेपो धाराशिव ता. जि. धाराशिव हे १५.१० वा. सु.आडत लाईन धाराशिव येथे तिरट मटका जुगाराचे साहित्या एकुण १८,६५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## आरोग्य सेवक (पुरुष) पदासाठी बनावट नियुक्ती आदेशांचा पर्दाफाश

### आरोग्य विभागाचे उमेदवारांना सतर्कतेचे आवाहन

धाराशिव, (जिमाका) : आरोग्य सेवक (पुरुष) या पदासाठी बनावट नियुक्ती आदेश देऊन फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून,यासंदर्भात एका वृत्तपत्रात दिनांक ०४.०२.२०२६ रोजी बातमी प्रसिद्ध झाली आहे.या प्रकरणात अज्ञात व्यक्तीने आरोग्य विभागाच्या खोट्या लेटरपॅडचा वापर करून,संगणकाच्या सहाय्याने जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या खोट्या व बनावट सह्या एडिट केल्या आहेत. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या स्वाक्षरीचे असल्याचे भासवून जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे रिक्त पदावर रुपये २९,२०० ते ९२,३०० या वेतनश्रेणीत नियुक्ती आदेश दिल्याचे दिसून आले आहे. या बनावट आदेशांबाबत प्रसारमाध्यमांत वृत्त प्रसारित झाले आहे.

जिल्हा परिषद,धाराशिव अंतर्गत सरळसेवा पदभरती सन-२०२३ साठी जाहिरात क्र. १/२०२३ दिनांक ०५.०८.२०२३ च्या अनुषंगाने विविध संवर्गातील एकूण ४५३ पदे सरळसेवा पदभरतीसाठी प्रस्तावित करण्यात आली होती.यामध्ये आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के व आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी खइझड,मुंबई यांच्यामार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली.प्राप्त गुणवत्ता यादीनुसार कागदपत्र पडताळणीअंती अंतिम निवड यादीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची सर्व माहिती जिल्हा परिषदेच्या व एनआयसीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने उमेदवारांना आवाहन केले आहे की, अशा बनावट कागदपत्रांच्या आधारे तयार केलेल्या आदेशांवर विश्वास ठेवू नये. अधिकृत माहिती केवळ जिल्हा परिषद व एनआयसीच्या अधिकृत संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात आलेली असून,त्याचे आवलोकन करावे.कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.तसेच अधिक माहितीसाठी आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,धाराशिव या कार्यालयाशी थेट संपर्क साधावा. आरोग्य विभाग अशा प्रकारच्या फसवणूक प्रकरणाचे समर्थन करीत नाही.या फसवणुकीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असण्याची दाट शक्यता असून,त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाची नाहक बदनामी झाली आहे.

तरी या प्रकरणाची सविस्तर पोलिस चौकशी करून,उमेदवारांना आरोग्य विभागात नोकरी लावण्याचे खोटे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी,असे निवेदन आरोग्य विभागाकडून पोलीस अधीक्षक,धाराशिव यांना देण्यात आले आहे.

## नाईचाकुरमध्ये संत गुरु रविदास महाराज जयंतीनिमित्त सप्तखंजिरीद्वारे डॉ. रामपाल महाराजांकडून जागर



तालुक्यातील नाईचाकुर येथे संत गुरू रविदास महाराज जयंती महोत्सव व स्व. प्रेमनाथ महादू ममदे यांच्या स्मरणार्थ संत गुरू रविदास महाराजांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त जयंती महोत्सव अन् कीर्तन सोहळ्याचे आयोजन केले होते. भैरवनाथ कानडे यांनी प्रास्ताविक केले. अमोल ममदे, शिक्षक संतोष ताजवे यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी गुरू रविदास महाराज जयंती उत्सव समिती अध्यक्ष अमर ममदे, संतोष ताजवे, लहू गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. या विजेत्यांचा झाला सन्मान परीक्षा विजेत्यांना जिल्हा परिषद प्रशाला प्रथम पारितोषिक विजेते प्रतिका राहुल पवार प्रथम ११०१ रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय विराज विजय करनुरे ५०१ रुपये, सन्मानचिन्ह शरदचंद्रजी पवार विद्यालय नाईचाकुर येथील संस्कार पंढरी पवार प्रथम ११०१ व सन्मानचिन्ह, द्वितीय दानिश फातीमा ताजोद्दीन शेख ५०१ रुपये व सन्मानचिन्ह.

उमरगा(प्रतिनिधी)-अंधश्रद्धेला बळी पडू नका, दारूबंदी अन् व्यसनमुक्ती झाल्यास आरोग्य सदृढ राहील. व्यवसाय, शिक्षण, शेती, उद्योगातून गती साधा. जातीभेद पाळू नका. स्त्री-पुरुष समान आहेत. समाजात समता, बंधुता, एकता नांदली पाहिजे, असे विचार महापुरुषांनी सांगितले आहेत. ते सर्वांनी अंगीकारले पाहिजेत. यासाठी क्रीडा व शिक्षण, शेती, उद्योग, व्यवसाय, नोकरी कोणत्याही क्षेत्रात असले तरी सत्कर्म करत राहिले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, थोर संत रविदास, संत तुकाराम, थोर संत व थोर समाजसेवक व संत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे समाज प्रबोधनपर विचार मनोरंजनात्मक पद्धतीने सप्त खंजेरीच्या वादनातून डॉ. रामपाल महाराज धारकर यांनी कीर्तनातून मांडले. नाईचाकूरमध्ये सोमवारी कीर्तन सोहळ्याला परिसरातील नागरिक, चर्मकार समाज बांधव उपस्थित होते.

## जाहीरनामा नव्हे वचननामा - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (प्रतिनिधी)- शेती, शेतकरी, ग्रामीण युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवून आणणारा ठोस विकासाचा आराखडा हाच आमचा अजेंडा असून, केवळ घोषणा नव्हे तर परिणामकारक अंमलबजावणी हेच आमचे धोरण आहे. शेतीसाठी सिंचन व पाणलोट विकासाच्या कामांना गती देत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचवणे, दुष्काळ व अवकाळी संकटावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि शेतमालाला योग्य व हमीभाव मिळवून देणे हा आमचा संकल्प आहे. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था अधिक दर्जेदार, आधुनिक व सुविधा-संपन्न करणे हे आमचे प्राधान्य असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शाळा, डिजिटल शिक्षण, क्रीडा व स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन असल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांचा शहरी विद्यार्थ्यांशी होणारा अन्यायकारक फरक दूर केला जाईल. आरोग्याच्या बाबतीत गावपातळीवर वेळेवर, सक्षम आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे बळकट केली जातील. डॉक्टर, औषधे, तपासणी सुविधा आणि आपत्कालीन सेवा सहज उपलब्ध होतील, जेणेकरून उपचाराअभावी एकही जीव जाणार नाही, हा आमचा ठाम निर्धार आहे. युवकांसाठी कौशल्यविकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील. स्थानिक गरजांनुसार प्रशिक्षण केंद्रे, उद्योगांशी थेट संलग्नता आणि स्वयंरोजगाराला चालना देऊन युवकांना हातात काम व डोक्यावर स्वाभिमान दिला जाईल. केवळ आश्वासनांचे राजकारण न करता प्रत्यक्ष रोजगारनिर्मितीवर भर दिला जाईल. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक मजबूत करण्यासाठी बचतगट, स्वयंरोजगार, उद्योगांना अर्थसहाय्य, प्रशिक्षण आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल. महिला स्वावलंबी झाल्याशिवाय कुटुंब आणि समाज सक्षम होऊ शकत नाही, या ठाम भूमिकेतून निर्णय घेतले जातील हे सर्व करताना पारदर्शक, उत्तरदायी आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन हा कळीचा मुद्दा असेल. प्रत्येक कामात प्रामाणिकपणा, जनतेसमोर उत्तरदायित्व आणि विकासात समानता राखली जाईल. सत्तेचा उपयोग लूटीसाठी नव्हे, तर लोकसेवेसाठी केला जाईल, हे आम्ही कृतीतून दाखवून देऊ. शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला सक्षमीकरण आणि पारदर्शक प्रशासनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक व शाश्वत बदल घडवून आणणे हाच आमचा ठोस विकासात्मक संकल्प आहे. हा लढा केवळ सत्तेसाठी नसून, सामान्य माणसाच्या हक्कांसाठी आणि उज्वल भविष्यासाठी आहे. मत विकासाला मत मशालीला.

## कळंब – ढोकी जिल्हा धाराशिव परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद नाही

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक ०४.०२.२०२६ रोजी सकाळी ९.१० ते १०.०० मिनिट या सुमारास कळंब - ढोकी जिल्हा धाराशिव परिसरात भूगर्भातून गुढ आवाज होऊन भूकंप सदृश्य धक्का जाणवल्याची माहिती स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झाली होती.

सबब माहितीची जिल्हा प्रशासनाने त्वरित नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (NCS) या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आली असता त्यांचेकडून करण्यात आलेल्या तपासणीनुसार,या परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नसल्याचे कळविले आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे आवाहन करण्यात येते की,नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि घाबरून जाऊ नये.

**-जिल्हाधिकारी धाराशिव**

## कळंब शहर व्यसनाच्या विळख्यात; १२ ते ३० वयोगटातील तरुण सुलोचनच्या आहारी!

कळंब (प्रतिनिधी)- कळंब शहर सध्या व्यसनांच्या विळख्यात अडकत चालले असून, विशेषतः १२ ते ३० वयोगटातील तरुण पिढी सुलोचन ओढण्याच्या आहारी गेल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. चौकाचौकांत, सार्वजनिक ठिकाणी खुलेआम व्यसन सुरू असताना कळंब पोलीस प्रशासनाचे संशयास्पद दुर्लक्ष नागरिकांच्या संतापाला कारणीभूत ठरत आहे.

व्यसनाच्या वाढत्या प्रमाणामुळे शहरात हाणामाऱ्या, वादविवाद, दहशतीचे प्रकार आणि किरकोळ गुन्हे दिवसेंदिवस वाढत आहेत. यामुळे शांत शहराची ओळख पुसली जात असून, महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार तक्रारी करूनही पोलीस यंत्रणा केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे. जर वेळीच ठोस कारवाई झाली नाही, तर ही व्यसनाची लाट तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त करेल, असा गंभीर इशारा जाणकार व्यक्त करत आहेत.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून शहरात विशेष मोहीम राबवावी, व्यसन विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी आणि तरुण पिढीला या दलदलीतून बाहेर काढावे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत फेरोज रा. चोराखळी ता. कळंब जि. धाराशिव ह.मु. धाराशिव साखर कारखाना यांनी दि.३१.०१.२०२६ रोजी चोराखळी शिवारात केजीएन हॉटेल मध्ये कारखान्याजवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, राजनिवास पानमसाला असा एकुण १,६०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला येरमाळा पो ठाचे पथकास मिळून आला.

यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा. न्या. सं. कलम- २२३, २७४, २७५,१२३ अन्वये येरमाळा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धुळीमुळे व्यावसायिक त्रस्त: बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी चौक रस्त्यावर अर्धवट कामे

धाराशिव(प्रतिनिधी)-शहरातील राजमाता जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या प्रमुख मार्गाचे काम सुरू आहे. परंतु आजही ते काम अर्धवट आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. येथून जाणाऱ्या वाहनांमुळे उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे वाहनधारकांसह, रस्त्याकडेचे व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. गत ५ महिन्यांपासून हा त्रास सुरू असून, नागरिकांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागत आहे. एकीकडे प्रचंड धुळीचे लोट उडत आहेत तर दुसरीकडे रस्त्यावरील दगड, गोटे उडून दुकानांच्या काचा फुटत आहेत. यामुळे अनेक दुकानदारांना दिवसभर दुकानात बसणे कठीण झाले आहे. अनेक दुकानदार दुकानात मास्क लावून बसतात. काही दुकानदार तर दररोजच्या धुळीमुळे आजारी पडले आहेत. हनुमान चौक ते जिजाऊ चौक हा रस्ता ठिकठिकाणी खोदून चार महिन्यांचा कालावधी लोटला. परंतु आजही जिजाऊ चौक ते लेडीज क्लबपर्यंत डाव्या बाजूच्या रस्त्याचे केवळ ७०० मीटर काम पूर्ण झाल्याने वाहनधारकांची मोठी कसरत होत आहे.

## प्रा. श्रीराम मुळीक यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार




कळंब (प्रतिनिधी)- कळंब येथील सुपुत्र प्रा. श्रीराम मुळीक यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेत चित्रपट युनियनतर्फे प्रतिष्ठित दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे झालेल्या भव्य समारंभात प्रसिद्ध फाईट मास्टर श्री. जावेद हैदर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. श्रीराम मुळीक यांनी आजवर अनेक गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत शिक्षणाची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवली आहे. शिक्षणापुरतेच नव्हे तर सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी तीन अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक व मानसिक आधार दिला. तसेच दोन भिकाऱ्यांना व्यवसाय उभा करून देत स्वावलंबनाचा मार्ग दाखवला, ज्यामुळे ते सन्मानाने उदरनिर्वाह करत आहेत.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, चित्रपट अभिनेते सुनील गोडबोले, अजित मामुनकर यांच्यासह मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर कलाकार उपस्थित होते.

या सन्मानामुळे कळंब व वाशी तालुक्याचा नावलौकिक राज्यपातळीवर उंचावला असून प्रा. श्रीराम मुळीक यांच्यावर मित्रपरिवार, विद्यार्थी व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ग्रामीण विकासाचे स्त्रोत जिल्हा परिषद..

राज्यातील काही जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होत आहेत. अनेक वर्षापासून या बाबत निवडणुका होत नव्हत्या. अखेर सरकारने नगरपरिषद, महानगरपालिका व जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचे ठरविले. नगरपरिषदा व महानगरपालिकेत सत्ताधारी भाजपाला मतदार नागरिकांनी स्विकारले, आता जिल्हा परिषदा व पंचायत समितीचा कोणाकडे कल दिसून येईल हे निवडणुकीच्या निकालानंतर सांगता येणार आहे. ग्रामीण भागाचा विकास व विविध विकास योजना राबविणारे ठिकाण म्हणजे जिल्हा परिषद, ग्रामीण भागाचा विकास हा जिल्हापरिषदामार्फेत केला जातो. केंद्राकडून बराच निधी थेट जिल्हापरिषदांना मिळतो. ग्रामीण भागाचा विकास हा जिल्हापरिषदाकडून होत असल्याने सर्वात महत्वाची निवडणुक तशी जिल्हापरिषदची समजली जाते. येथून सर्व निवडणुकीची सुरवात होत असते. मुळात भारत हा ग्रामीण भागात वसलेला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळे भारताला कृषी प्रधान देश समजला जातो. ग्रामीण भागाच्या विकासासाठी जिल्हापरिषदा ह्या सक्षम असाव्या लागतात. जिल्हा परिषदेकडून सर्व ग्रामीण भागातील यंत्रणा चालविली जाते. ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्वतंत्र यंत्रणा या स्थानिक स्वराज्य संस्थेत सामावली आहे. प्रत्येक विभाग जिल्हापरिषदेमध्ये आहे. जसे आरोग्य, कृषी, बांधकाम, पाटबंधारे, डीआरडीए असे किती तरी विभाग हा ग्रामीण भागासाठी कार्यरत असतात. अशा जिल्हापरिषदेत प्रतिनिधी पाठविण्यासाठी निवडणुक प्रक्रिया चालू आहे. येत्या शनिवारी मतदान आहे. यात आपले प्रतिनिधी निवडण्याची संधी ग्रामीण भागातील नागरिक, शेतकऱ्यास मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास साधणाऱ्यास विजयी केले पाहिजे. यात सहसा पक्ष पाहिले जात नाही तर विकास करणाऱ्याच उमेदवारास निवडले जाते हा आता पर्यंतचा अनुभव आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हापरिषद व पंचायत समिती महत्त्वाची आहे ती अधिक सक्षम झाली पाहिजे. सक्षम करणारे उमेदवार निवडले गेले पाहिजेत. काही झाले तर अनेक वर्षापासून निवडणुका होत नव्हत्या. आता पर्यंत प्रशासकीय राज होते. अशा प्रशासकिय राज्यात जनतेचे काही चालत नव्हते. त्यामुळे काही प्रमाणात ग्रामीण भागाचा विकास मंदावला होता. आता अधिक गती मिळण्यासाठी योग्य उमेदवार जिल्हापरिषद व पंचायत समितीमध्ये पाठविणे आवश्यक आहे. पुर्वी पक्षाचा शिरकाव यामध्ये फारसा दिसत नव्हता, आलिकडे पक्षाची घुसखोरी होताना दिसून येत आहे. यामुळे संघर्ष होण्याची शक्यता असते. गाव तसे शहरासारखे, तालुक्यासारखे नसते. अतिषय कमी लोकसंख्येचे गावात सर्वानुमते निवड अपेक्षित असते. लोकशाही एवढी अंगवळणी झाली आहे की, निवडणुका ह्या अटळ होत आहेत. लहान गावात कमी मतदार संख्या असताना देखिल मतदान होते. हे लोकशाही प्रबल होण्याचे संकेत आहेत. आता येत्या शनिवारी मोठ्या प्रमाणात मतदान झाले पाहिजे. ग्रामीण भागातील जनता आज पर्यंत मतदानात मागे नाही. सर्व काम-धंदा सोडून आपला मताचा हक्क बजावतील. मतदान केल्याशिवाय कोणी कामाला जात नाही, त्यामुळे मतदान मोठ्या प्रमाणात होते हा आजपर्यंतचा अनुभव आहे. मतदान केले पाहिजे. ग्रामीण भागाचा विकास साधावयाचा झाला तर योग्य प्रतिनिधी पाठविले पाहिजेत. काही झाले तरी आपल्या गटाचा विकास, गावाचा विकास साधणारी मंडळींना निवडली पाहिजे. आलिकडे केंद्राकडून मोठ्या प्रमाणात निधी जिल्हापरिषदेकडे वर्ग होते. तेथून पंचायतसमितीला अनुदान मिळते. वास्तविक ग्रामीण भागातील ही निवडणुक असली तरी ती महत्वाची आहे. येथे सर्वजन प्रचारात झटतात. प्रत्येकजन माहिती घेतो. वैयक्तिक संबंध येतात. उमेदवार हा आपल्याच भागातील किंबहुन गावाचा असल्याने विकासाची कामे आडली जात नाहीत. विकासाची कामे करून घेण्यात ग्रामीण भागातील नागरिक जिद्दी असतात. गावाचा रस्ता किंवा पिण्याची पाण्याची व्यवस्था करावयाची झाली तर ते करून घेण्याची चिकाटी दिसून येते. ग्रामीण भागातील निवडणुका ह्या तशा पाहिल्यातर लोकशाही वृद्धींगत करतात. येथून लोकशाहीची पहिली पायरी समजली जाते. जिल्हापरिषद व पंचायत समितीचा उमेदवार किंवा सभापती हा आगामी काळात आमदार होवू शकतो हे अनेक उदा. आहेत. त्यामुळे सर्वात महत्त्वाची निवडणुक आहे. याकडे कानडोळा करून चालत नाही. जिल्हा परिषद ह्या सक्षम बनविल्या जात आहेत. केंद्रात व राज्यात याविभागासाठी स्वतंत्र खाते आहे, मंत्रीपद आहे. ग्रामीण विकास मंत्रालय हे मोठी मदत जिल्हापरिषदांना करीत असते. त्यामुळे आपले प्रतिनिधी जिप व पंसमध्ये योग्य पाठविण्याची जबाबदारी ही मतदारांची आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे येत्या शनिवारी मोठ्या प्रमाणात मतदान झाले पाहिजे. पक्षीय राजकारण कमी असते, तरी त्याचा शिरकाव होतान येत आहे. यामुळे भांडणे होण्याची शक्यता अधिक दिसून येते. तरी राज्यात आतापर्यंतची निवडणुक प्रक्रिया ही शांततेत पार पडली आहे. प्रत्येक उमेदवारांच्या सभा होत आहेत. विचार व आगामी विकासाची माहिती दिली जात आहे. वरचेवर पक्षाचे प्राबल्य दिसून येत आहे. या पक्षाचे, त्या पक्षाचे उमेदवार उभे केल्याचे सांगत आहेत. तसे पुर्वी जिल्हापरिषदा व पंचायत समिती त्यामध्ये नव्हते आलिकडे पक्षाची एन्ट्री होताना दिसून येत आहे. एवढे मात्र नक्की, ग्रामीण भागात राजकारणाचा शिरकाव मोठया प्रमाणात होताना दिसून येत आहे. त्यामुळे गट, तट आदिमुळे संघर्ष होण्याची भीती असते. मुळात देशच ग्रामीण भागात वसलेला आहे. अशा ग्रामीण भागाचा अधिक विकास कसा साधता येईल याचा विचार करणारी मंडळी जिल्हा परिषदेमध्ये पाठविली पाहिजे. ही अनेक वर्षानंतर मिळालेली संधी आहे. अनेक वर्ष प्रशासकिय काळ होता. लोकप्रतिनिधी नव्हते. त्यामुळे आपले प्रतिनिधी नव्हते. ती आता निवडण्याची संधी आली आहे. त्यामुळे भरघोष असे मतदान होणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागाचा विकास म्हणजे देशाचा व्रिकास समजला जातो. ग्रामीणतील विकास हा देशाच्या विकासाची पहिली पायरी आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी योग्य आपले प्रतिनिधी निवडणे ही सर्वच मतदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मतदान झाले पाहिजे.

# कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत रोगनिदान होणे आवश्यक

संपुर्ण जगामध्ये दरवर्षी ०४ फेब्रुवारी रोजी 'जागतिक कर्करोग दिन' साजरा करण्यात येतो. कर्करोगाबाबत लवकर निदान होणे, प्रतिबंध करणे, उपचार व जीवनशैलीचा वापर इत्यादी विषयी जनजागृती करणे हे मुख्य उदिद्ष्ट आहेत. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उदिद्ष्ट कर्करोगाचे प्रमाण व मृत्यू कमी करणे असुन, कर्करोगापासुन बचाव कसा करावा या बाबतची माहितीची जनजागृती करण्याचे उदिद्ष्ट आहे.

असंसर्गजन्य आजारांची झपाट्याने वाढ होत असल्यामुळे कर्करोगाबाबतची माहिती जनतेस मिळणे आवश्यक आहे. कारण कर्करोग कोणालाही होवू शकतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार कर्करोग हा दुसऱ्या क्रंमाकाचा सर्वात घातक आजार आहे. अंतिम टप्प्यात असलेल्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. कर्करोगामुळे मृत्यू होणाऱ्या लोकांची स्थिती भारतासाठी गंभीर आहे. कर्करोगामध्ये रोगांचा समुह असुन, त्यामध्ये असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढुन शरीराच्या अवयवमध्ये पसरतात. ॲन्कोलॉजी (कर्करोगाचा अभ्यास) आणि कर्करोगावरील संशोधनासाठी प्रशिक्षण व शिक्षणासाठी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे. ज्यामुळे कर्करोगामुळे होणारे मृत्यू टाळणे शक्य होईल.

कर्करागाच्या प्राथमिक अवस्थेत सतत अतिसार, अशक्तपणा, खोकला तोंडातुन रक्त येणे, स्तनातील गाठ, कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही. यासाठी मेमोग्राम, ओ.व्ही.ई., व्ही.आय.ऐ., सिटी स्कॅन, एम.आर.आय., सोनोग्राफी, बायोप्सी इ. तपासणीमुळे कर्करोग अंतिम टप्प्यामध्ये जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते. एच.पी. व्ही. (हयुमन पॅपिलोमाव्हायरस) लसींमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळता येतो. तसेच हिपॅटायटीस बी या लसीमुळे यकृतचा कर्करोग होण्याचा धोका कमी होतो.

आज कर्करोगामध्ये विविध उपचार उपलब्ध आहेत. रुग्णांच्या शरीरामध्ये किंवा कोणत्या टप्प्यात आहे यावर उपचार पध्दती अवलंबुन आहे. कर्करोगाच्या उपचारामध्ये शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडियशन थेरपी, इम्युनोथेरपी, हार्मानथेरपी इ. प्रकाराचा वापर केला जातो.

कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत-कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही. याकरिता नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. कारण कर्करोग अंतिम टप्प्यात जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते. त्यामुळे पुढील मृत्यूचा धोका टळतो. लवकर निदान लवकर उपचारामुळे कमी खर्चात उपचार होतो. अर्थात उशीरा निदान झाल्यामुळे उपचार खर्चिक होतो. तसेच हॉस्पीटलमध्ये दीर्घकाळ ॲडमिट राहावे लागते.

संतुलीत आहार, फळे, हिरवा पालेभाज्या इ. समावेश असावा. नियमित व्यायाम करणे. अतिनील किरणोत्सर्गाचा संपर्क टाळणे, प्रदुषण, तंबाखु व मद्यपानाचे सेवन करु नये. रोगप्रतिकार शक्ती चांगली असल्याकारणाने कर्करोगाचा धोका कमी होतो. निरोगी जीवनशैली असावी.

जालना जिल्ह्यात सन २०२१ ते २०२५ या कालावधीत मौखिक कर्करोगाच्या ७५, ९५५ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १८४ रोगनिदान झाले असुन, १७३ औषधोपचाराखाली आहेत. तसेच स्तनाचा कर्करोगाच्या ३९,४३२ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १४२ रोगनिदान झाले असुन, १३३ औषधोपचाराखाली आहेत. गर्भाशय मुखाचा कर्करोगाच्या ५०,३८३ तपासणी करण्यात आल्यात याम ध्ये १५८ रोगनिदान झाले असुन, १४१ औषधोपचाराखाली असल्याची माहिती जिल्हा आरोगय अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी दिली. जिल्ह्यातील ३० वर्षावरील स्त्री पुरुष यांनी नियमित आपल्या आरोग्याची तपासणी करुन घ्यावी. तसेच अधिक माहितीसाठी टोल फ्रि क्रमांक १०४ १०२ या हेल्पलाईनवर कॉल करावा.

# 'या' लोकांनी अजिबात करू नये बडीशेपचे सेवन, उद्भवतील विविध आरोग्य समस्या



आजकाल प्रत्येकजण निरोगी राहण्यासाठी विविध प्रयत्न करत आहेत. निरोगी राहण्यासाठी, तुमच्या आहारात फक्त अशाच गोष्टींचा समावेश करणे खूप महत्वाचे आहे जे तुमच्या शरीराच्या प्रकारासाठी योग्य आहेत. बऱ्याचदा लोक एखाद्या पदार्थांचे फायदे ऐकल्यानंतर ते खायला सुरुवात करतात. परंतु ते त्यांच्या शरीरासाठी योग्य आहे की नाही याचा विचार करत नाहीत.

बडीशेप ही अशी एक गोष्ट आहे जी सामान्यतः प्रत्येक घरात वापरली जाते. आणि पचन, श्वसनाच्या समस्या आणि डोळ्यांसाठी फायदेशीर मानली जाते. आयुर्वेदात, बडीशेपला थंडगार, गोड आणि पचन करणारे औषध मानले जाते.परंतु याचा अर्थ असा नाही की ते प्रत्येकासाठी योग्य आहे. काही लोकांना बडीशेप खाल्ल्यास आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळेच आपण जाणून घेऊया कोणत्या लोकांनी बडीशेपचे जास्त सेवन करू नये

डासांना पळवून लावण्यात फायदेशीर आहे लिंबू, पण कसं वापरायचं जाणून घ्या

डासांना पळवून लावण्यात फायदेशीर आहे लिंबू, पण कसं वापरायचं जाणून घ्या

**गर्भवती महिला–**

गर्भधारणेदरम्यान बडीशेपचे जास्त सेवन गर्भाशयाला उत्तेजित करू शकते. आणि आयुर्वेद गर्भाशयाला उत्तेजित करणारे कोणतेही पदार्थ टाळण्याची शिफारस करतो. विशेषतः गर्भधारणेच्या सुरुवातीच्या महिन्यांत असे पदार्थ खाऊ नयेत. योग्य प्रमाणात त्याचे सेवन करणे सुरक्षित मानले जाऊ शकते, परंतु तरीही याबाबतीत डॉक्टरांचा सल्ला आवश्यक आहे.

**कफ दोष–**

जर तुमच्या शरीरात कफ दोष जास्त असेल.जसे की वारंवार खोकला येणे, घशात श्लेष्मा येणे, घशात जडपणा, निद्रानाश, भूक न लागणे इत्यादी, तर मर्यादित प्रमाणात बडीशेपचे सेवन करा. जरी बडीशेप कफ संतुलित करते, परंतु जास्त सेवनाने ते वाढू शकते. विशेषतः थंड पाण्यासोबत किंवा रात्री सेवन केल्यास कफ लगेच वाढू शकते.

**वात दोष–**

वात दोष असलेल्या लोकांना सामान्यतः गॅस, बद्धकोष्ठता, सांधेदुखी, झोपेच्या समस्या, चिंता इत्यादी समस्या येतात. बडीशेपचे दररोज जास्त सेवन केल्याने वात दोषाचे असंतुलन होऊ शकते . कारण ते हलके आणि कोरडे असते. जर अशा व्यक्तींना बडीशेपचे सेवन करायचे असेल तर त्यांनी ते तुपासोबत सेवन करावे. त्यामुळे जास्त त्रास होणार नाही.

# मधुमेहाच्या रुग्णांनी दररोज कराव्या या ३ गोष्टी: रक्तातील साखर नियंत्रित राहण्यास होईल मदत

आयुर्वेद केवळ आरोग्य समस्यांवर उपायच देत नाही तर चांगले आरोग्य कसं राखायचं याचं तपशीलवार वर्णनही करतो. सहज उपलब्ध होणाऱ्या घटकांपासून ते दुर्मिळ घटकांपर्यंत, आयुर्वेद त्यांचे फायदे सविस्तरपणे सांगतो. आयुर्वेदानुसार , ''आहार, औषध आणि जीवनशैली'' हे मधुमेह नियंत्रणाचे तीन आधारस्तंभ आहेत. तज्ञ म्हणतात की, या तीन घटकांच्या आधारे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित केली जाऊ शकते. या लेखात, कसे ते जाणून घेऊया...




मधुमेह असलेल्या लोकांसाठी आयुर्वेदिक उपचारांसाठी संतुलित आहार अत्यंत महत्त्वाचा आहे असं आहारतज्ञांचं म्हणणं आहे. आयुर्वेद हळूहळू पचणाऱ्या पदार्थांवर भर देतो. यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते आणि शरीराला सतत ऊर्जा मिळते.

**काय खावे**

तज्ञांचे म्हणणे आहे की, आहारात संपूर्ण धान्य आणि बार्ली, गहू, तपकिरी तांदूळ, बाजरी आणि ज्वारी यांचा समावेश करणे फायदेशीर आहे. ते म्हणतात की, यामुळे सतत ऊर्जा मिळते. विशेषत: बार्ली वजन नियंत्रित करण्यास मदत करते आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवते.

याव्यतिरिक्त, आयुर्वेदिक उपचारांचा भाग म्हणून, तज्ञ कारले, कडुलिंब, तुळस, आवळा, मेथी, काळी मिरी आणि आले यासारखे कडू आणि तिखट पदार्थ खाण्याची शिफारस करतात. हे पदार्थ रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास आणि इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करतात असे म्हटले जाते.

तज्ञांचे म्हणणे आहे की, जर्दाळू आणि पपई सारखी काही फळे स्वादुपिंड मजबूत करतात. त्यांच्यात रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे विशेष गुणधर्म आहेत. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये असे म्हटले आहे की जर्दाळूमध्ये अँथोसायनिन्स आणि एलाजिक ॲसिड सारखे संयुगे असतात, ज्यात स्टार्चचे साखरेत रूपांतर होण्यापासून रोखण्याची क्षमता असते, ज्यामुळे त्यांना मधुमेह विरोधी गुणधर्म मिळतात.

औषधाच्या युगातील औषधी वनस्पती: तज्ञांचं म्हणणं आहे की, आयुर्वेदात मधुमेह नियंत्रित करण्यासाठी असंख्य औषधी वनस्पती आणि उपचार उपलब्ध आहेत. मेथी, कडुलिंब, हळद, आवळा, गुरमार आणि दालचिनी यासारख्या औषधी वनस्पती रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करतात.

**जीवनशैली**

जीवनशैलीतील बदलांद्वारे मधुमेह नियंत्रित केला जाऊ शकतो असे आयुर्वेदिक तज्ञांचे म्हणणे आहे. ग्रॅडीहेल्थच्या एका अभ्यासातून असं दिसून आले आहे की योगासने, चालणे, धावणे आणि पोहणे यासारख्या नियमित व्यायामामुळे इन्सुलिन संवेदनशीलता सुधारू शकते. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी तज्ञ दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करण्याची शिफारस करतात.

स्लीप फाउंडेशनचे म्हणणे आहे की झोपेच्या कमतरतेमुळे इन्सुलिन प्रतिरोधकता वाढते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. म्हणूनच, तज्ञ दररोज किमान सात ते आठ तासांची शांत झोप घेण्याची शिफारस करतात. ताण आणि चिंता व्यवस्थापित करणे देखील महत्त्वाचे आहे.

ताजे शिजवलेले, गरम अन्न पदार्थ वेळेवर खाल्ल्यानं चयापचय सुधारते असं तज्ञांचं म्हणणे आहे. तज्ञ चरबीयुक्त पदार्थ, तळलेले पदार्थ, थंड पदार्थ, दूध, दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, बटाटे, डाळी आणि रिफाइंड पिठापासून बनवलेले पदार्थ टाळण्याचा सल्ला देतात

# पचनक्रिया सुधारण्यासाठी जेवणानंतर खा 'ही' ४ फळे, मिळेल फायदा

आयुर्वेदानुसार आपण जे काही खातो ते पचवण्यासाठी आपल्या शरीराला अंदाजे १ ते १.३० तास लागतात. नाश्त्यात खाल्लेले ब्रेड आणि ऑम्लेटही पचत नाही आणि तोपर्यंत आपण दुसरे काहीतरी खातो. जेवणांमध्ये योग्य अंतर न ठेवल्यामुळे पोटदुखी, गॅस आणि पोटात गोळे येऊ शकतात.

जे नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण योग्यरित्या खातात त्यांनाही पचनाच्या समस्या येऊ शकतात. म्हणूनच, पचनाच्या समस्या टाळण्यासाठी जेवणानंतर कोणते फळ खावे असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यामुळेच आपण जेवणानंतर कोणती फळे खावीत याबाबत जाणून घेऊया

**पेरू–**



जेवणानंतर पेरू खाणे देखील फायदेशीर आहे. पेरू हा व्हिटॅमिन सीचा चांगला स्रोत आहे, जो पचन सुधारतो. पेरूमध्ये आढळणारे पोषक घटक पचनाच्या समस्या दूर करण्यास मदत करतात. तुम्ही पेरू सॅलड देखील बनवू शकता आणि त्याचे सेवन करू शकता.

**संत्री–**



पोटात जडपणा, अपचन आणि गॅस कमी करण्यासाठी जेवणानंतर संत्री खाण्याचा सल्ला दिला जातो. संत्री हा व्हिटॅमिन सी आणि फायबरचा चांगला स्रोत मानला जातो. जेवणानंतर लगेचच काळे मीठ घालून संत्री खाल्ल्याने अन्न लगेच पचण्यास मदत होते. वयानुसार अनेक लोकांची पचनसंस्था कमकुवत होते. म्हणूनच, जेवणानंतर दररोज संत्री खाण्याचा सल्ला दिला जातो. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही पचनाच्या समस्या दूर करण्यासाठी तुमच्या आहारात संत्र्याचा रस देखील समाविष्ट करू शकता.

**पपई–**



जर तुम्हाला नाश्ता, दुपारचे जेवण किंवा रात्रीच्या जेवणानंतर फळ खायचे असेल तर तुम्ही पपई खाऊ शकता. पपई हा फायबर आणि प्रथिनांचा चांगला स्रोत मानला जातो. जेवणानंतर पपई खाल्ल्याने पचनसंस्था मजबूत होते. पपईचे नियमित सेवन पचनाच्या समस्या टाळते.

**सफरचंद–**



जेवणानंतर सफरचंद खाणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. सफरचंद प्रथिने, फायबर आणि जीवनसत्त्वे समृद्ध असतात. सफरचंदाचे नियमित सेवन केल्याने पोटदुखी, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्या दूर होण्यास मदत होते. परंतु रात्रीच्या जेवणानंतर सफरचंद खाऊ नये. सफरचंद नेहमी दुपारच्या जेवणानंतर खा.

# फुफ्फसे निरोगी आणि मजबूत ठेवण्यासाठी आवश्यक आहेत 'हे' व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स

फुफ्फुसे श्वसनाच्या आरोग्यामध्ये सर्वात महत्वाचे आणि सर्वात मोठे अवयव आहेत. म्हणून, श्वसन समस्या कमी करण्यासाठी आणि फुफ्फुसांचे आरोग्य राखण्यासाठी विविध व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स सेवन केली जाऊ शकतात. या पदार्थांचे सेवन केल्याने फुफ्फुसांशी संबंधित आजार कमी होतील आणि शरीर निरोगी राहील. श्वसन समस्या कमी करण्यासाठी आणि फुफ्फुसांचे आरोग्य राखण्यासाठी कोणते व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स सेवन करावीत ते पाहूया..

**ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स–**

ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स शरीराचे रोगांपासून संरक्षण करतात. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सचे नियमित सेवन जळजळ कमी करते आणि अनेक गंभीर आजारांना दूर करते. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स अक्रोड, सोयाबीन आणि चिया सीड्ससारख्या अनेक पदार्थांमध्ये आढळतात.

**मॅग्नेशियम–**

मॅग्नेशियम फुफ्फुसांमधून हवा प्रवाहित करण्यास मदत करते. त्याचे सेवन स्नायूंना आराम देते आणि फुफ्फुसांना डिटॉक्स करते. त्याचे सेवन अनेक रोगांचा धोका कमी करते आणि श्वसन समस्या कमी करते. मॅग्नेशियम मिळविण्यासाठी विविध हिरव्या भाज्यांचे सेवन केले जाऊ शकते.

**सेलेनियम–**

शरीर निरोगी ठेवण्यासाठी आणि फुफ्फुसांना डिटॉक्स करण्यासाठी सेलेनियमचे सेवन केले जाऊ शकते. त्याच्या सेवनाने न्यूमोनियाचा धोका कमी होतो आणि श्वसन समस्या कमी होतात. सेलेनियम मिळविण्यासाठी मासे, अंडी आणि चीजचे सेवन केले जाऊ शकते.

**व्हिटॅमिन सी–**

श्वसन समस्या कमी करण्यासाठी व्हिटॅमिन सीचे सेवन आवश्यक आहे. संत्री, लिंबू आणि द्राक्षे यासारख्या अनेक पदार्थांमध्ये व्हिटॅमिन सी आढळते. त्याचे सेवन रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि हंगामी आजारांचा धोका कमी करते. व्हिटॅमिन सी संसर्गाचा धोका कमी करते आणि श्वसन समस्यांपासून आराम देते.

**व्हिटॅमिन डी–**

श्वसन समस्या कमी करण्यासाठी आणि फुफ्फुसांना निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन डीचे सेवन आवश्यक आहे. व्हिटॅमिन डीचे सेवन श्वसनमार्गांमध्ये जळजळ आणि संसर्ग रोखते.

# फुफ्फुसाच्या समस्या आणि त्यावर उपाययोजना



हल्ली प्रदूषण, धूम्रपान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत आहेत. फुफ्फुसे शरीराला ऑक्सिजन पुरवण्याचे काम करतात, त्यामुळे ते निकामी झाल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात.

खाली फुफ्फुसांच्या समस्यांची लक्षणे आणि त्यावर उपाय मराठीत दिले आहेत:

फुफ्फुसाच्या समस्यांची प्रमुख लक्षणे (ड्रूर्ाीि ष डींपस झीलश्रशीि)

सतत खोकला राहणे: ८ आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला राहणे.

श्वास घेण्यास त्रास (धाप लागणे): थोडे चालल्यावर किंवा पायऱ्या चढल्यावर श्वास फुळणे.

छातीत घरघर होणे (थहशशूळपस): श्वास घेताना शिट्टीसारखा आवाज येणे.

जास्त कफ (श्लेष्मा) तयार होणे: एक महिन्याहून अधिक काळ कफ पडणे.

छातीत दुखणे किंवा जडपणा: सतत छातीत कळा येणे.

खोकल्यातून रक्त येणे: हे गंभीर लक्षण आहे.

सतत थकवा जाणवणे: फुफ्फुसात पुरेसा ऑक्सिजन न गेल्यामुळे शरीरात ऊर्जा कमी होणे.

वजन कमी होणे: अनहेल्दी फुफ्फुसामुळे मसल मास कमी होतो.

फुफ्फुसांच्या समस्यांची कारणे (उर्रीशी)

धूम्रपान: सिगारेट किंवा हुक्का ओढणे हे मुख्य कारण आहे.

वायू प्रदूषण: हवेतील धूळ, धूर.

इन्फेक्शन: बॅक्टेरिया, व्हायरल किंवा फंगल इन्फेक्शनमुळे.

कामाच्या ठिकाणी होणारा संपर्क: रसायने, स्बेस्टॉस.

फुफ्फुसे निरोगी ठेवण्याचे उपाय (डेर्श्री- ींळेपी/ठशाशवळशी)

**१. घरगुती उपाय:**

आल्याचा आणि तुळशीचा काढा: आल्यामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुण असतात, जे कफ काढण्यास मदत करतात.

**वाफ घेणे** :गरम पाण्याची वाफ घेतल्याने श्वसनमार्ग मोकळा होतो आणि कफ सैल पडतो.**हळदीचे दूध:** रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी फायदेशीर.

मध आणि लिंबू: खोकल्यामुळे घसा खवखवत असल्यास हे मिश्रण फायदेशीर आहे.

**२. जीवनशैलीत बदल:** धूम्रपान त्वरित सोडा: हे फुफ्फुसाचे आरोग्य राखण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे.

**प्रदूषण टाळा:** बाहेर पडताना मास्कचा वापर करा.

नियमित व्यायाम: योगा आणि प्राणायाम (उदा. भस्त्रिका, कपालभाती) फुफ्फुसाची क्षमता वाढवतात. फुगा फुगवण्याचा व्यायाम फुफ्फुसे मजबूत करण्यासाठी हा व्यायाम उपयुक्त आहे.

**३. आहार:**

अँटीऑक्सिडंट फूड्स: आहारात पालक, ब्रोकोली, टोमॅटो, सफरचंद, बीटरूट आणि बियांचा समावेश करा.

**जास्त पाणी प्या:** शरीराला हायड्रेट ठेवल्याने कफ पातळ होण्यास मदत होते.

डॉक्टरांकडे कधी जावे? (थहशप ींशशज्ञ चशवळ-लरश्र क्षश्रि)

अचानक श्वास घेण्यास खूप त्रास झाल्यास.

खोकल्यात रक्ताचे प्रमाण

# देशातील कृषी क्षेत्राला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देणार

**नवी दिल्ली :** देशातील शेतकर्‍यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी, अल्पभूधारक शेतकर्‍यांची शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी, शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी, प्रशिक्षित मनुष्य आणि उच्च-गुणवत्तेच्या तंत्रज्ञानावर भर दिला जाईल. त्यासाठी देशाच्या कानाकोपर्‍यातील शेतकर्‍यांसाठी फायदेशीर ठरेल, असे बहुभाषिक भारत विस्तार एआय टूल सुरू करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंदाजपत्रकात केली आहे. देशाच्या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमतेचे वारे वाहू लागले आहे. शेतकर्‍यांच्या कष्टाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळणार आहे. त्यासाठी केंद्र सरकार 'भारत विस्तार एआय टूल'ची म्हणजे 'व्हर्च्युल इंटीग्रेटेड सिस्टम टू एक्सेस अॅग्रीकल्चर रिसोर्स' हा बहुभाषिक एआय टूल विकसित करणार आहे. हे टूल देशातील प्रमुख भाषांमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे अडचणीच्या, नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकर्‍यांना निर्णय घेण्यासाठी मदत होणार आहे. एआय टूलमुळे नैसर्गिक आपत्तीत शेतकर्‍यांच्या नुकसानीची जोखीम कमी होईल, असेही अर्थमंत्री म्हणाल्या. नारळ, काजू आणि चंदन उत्पादकांसाठी घोषणा-पीक वैविध्यता वाढावी, शेतीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी, शेतकर्‍यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रात रोजगार निर्मिती व्हावी, या दृष्टीने किनारपट्टीवरील शेतकर्‍यांच्या अर्थकारणाला बळकटी देण्यासाठी नारळ, काजू, चंदन उत्पादकांसाठी विविध योजनांची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली.



## शेतकर्‍यांसाठी भारत विस्तार एआय टूल सुरू करणार

त्यानुसार देशातील एक कोटी नारळ उत्पादक शेतकर्‍यांची उत्पादकता वाढवण्याचे केंद्र सरकारचे लक्ष्य आहे. २०३० पर्यंत जागतिक स्तरावर काजू आणि भारतीय नारळाला प्रीमियम ग्लोबल ब्रँड करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली जाणार आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या मदतीने भारतीय चंदन परिसंस्थेला गती दिली जाणार आहे.

**मत्स्य व्यवसायाला बळकटी देणार**

मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी ५०० जलाशय आणि अमृत तलावांचा समन्वयीत विकास केला जाणार आहे. मत्स्य व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी मत्स्य उत्पादनात वाढ करणे, मत्स्य बाजारपेठ विकसित करणे आणि मत्स्य व्यवसाय वृद्धीसाठी स्टार्टअप्स, महिला बचतगट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांची मदत घेतली जाणार आहे, असेही सीतारामन म्हणाल्या. पशुपालन व्यवसायाला **अनुदानित कर्ज देणार**-पशुपालन व्यवसायासाठी अनुदानित कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. पशुपालन व्यवसायात चांगले प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मजुरांना प्रशिक्षण दिले जाईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. पशुपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी मूल्यसाखळीचा विकास केला जाईल. जेणेकरून पशुपालन आणि कुक्कुटपालन उत्पादनांना चांगला दर आणि बाजारपेठ उपलब्ध होईल, असेही अर्थमंत्री म्हणाल्या.

**काय आहे भारत विस्तार एआय?**

'भारत विस्तार' (व्हर्च्युअली इंटिग्रेटेड सिस्टम टू क्सेस ग्रीकल्चरल रिसोर्स) हे एक एआय-आधारित पब्लिक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर आहे. जे बहुभाषिक असून, याच्या सह्यायाने शेतकरी आपल्या भाषेत पिकांशी संबंधित माहिती मिळवू शकतील. याद्वारे सरकारी योजनांच्या माहिती बरोबरच, पिकांची उत्पादकता आणि जोखीम आदीसंदर्भातही शेतकरी माहिती मिळवून निर्णय घेऊ शकतील. सरकार 'कृषी साथी एआय' चॅटबॉट लॉंच करणार -हे टूल युनिफाइड सिस्टीम आणि टेस्टिंगची माहिती देणारे चॅटबॉट म्हणून कार्य करेल. शेतकर्‍यांच्या मदतीसाठी सरकारने 'कृषी साथी एआय'चॅटबॉट देखील लॉंच केला आहे. याद्वारे शेतकरी व्हॉईस चॅटिंगद्वारे आपल्या समस्या सोडवू शकतील.

भारत विस्तार एआय टूल शेतकर्‍यांना टेस्टिंग संदर्भात माहितीही देईल. यासंदर्भात सरकार पायलट टेस्टिंग करत आहे. ज्यामुळे शेतकरी भविष्यातील पिकांच्या

# करारावर सहमती

दुग्धजन्य पदार्थ, सोयाबीन, मका यासाठी बाजारपेठ खुली व्हावी याकरिता अमेरिकेने एच वन बी व्हिसासह सर्व आयुधे वापरली. महासत्तेच्या दिशेने होणारा भारताचा प्रवास रोखण्यासाठी व्यापार करारानंतरही ट्रम्प यांचे उद्योग सुरू राहणार आहेत.

भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करारावर अखेर सहमती झाली. या सहमतीनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेले प्रत्युत्तर शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणण्याची घोषणा केली. भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद केल्याचे ट्रम्प यांनीच त्यांच्या रीतीप्रमाणे परस्पर सांगून टाकले ! मोदी हे आपले सर्वात चांगले मित्र आहेत, असे ट्रम्प म्हणत आहेत आणि ट्रम्प यांचा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून 'प्रिय मित्र' असा करण्यात आला आहे. या त्यांच्या 'मित्रा'ने आणि मित्राच्या सहकार्‍यांनी भारताला दूषणे देण्याची एकही संधी गेल्या काही महिन्यांत सोडली नव्हती! युरोपीय महासंघाबरोबर व्यापार करार झाल्यावर लागलीच भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करारावर सहमती झाली, हे लक्षणीय. अमेरिकेने लादलेल्या प्रत्युत्तर शुल्कामुळे आणि नंतर पुन्हा रशियन तेलाचे कारण देत आणखी २५ टक्के शुल्क लादल्याने भारताची गैरसोय झाली. त्या



पार्श्वभूमीवर निर्यातीसाठी अन्य बाजारपेठा शोधण्याशिवाय देशासमोर मार्ग नव्हता. युरोपीय महासंघाबरोबर करार करण्यात भारताला यश आले. भारताने आपले कृषी आणि डेअरी क्षेत्र खुले करावे, यासाठी अमेरिकेचा दबाव होता. तो दबाव भारताने झुगारला, हे मोठे यश आहे. त्याचवेळी, रशियाची तेल खरेदी कमी अथवा बंद करण्यास अमेरिकेने भारताला भाग पाडले, हे कटु सत्य स्वीकारावे लागेल. त्यासाठी अमेरिकेनेच व्हेनेझुएलाचा पर्याय दिला आहे!

घातक पायंडा

भारत आणि रशियातील व्यवहाराबद्दल त्रयस्थ देशाने धोरण ठरविणे, हा नि:संशय घातक पायंडा आहे. यातून केंद्र सरकारची झालेली कोंडी मोठी असेल, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. कदाचित यामुळेच 'आम्ही जिंकलो, अमेरिकेला झुकवले', असा घोष सत्ताधारी अथवा भाजपकडून झालेला नाही. 'आम्ही निवेदन प्रसिद्ध करणार आहोत', ही भूमिका सरकारने घेतली असून ती सावधपणाची आहे. भारताला व्यापार करार महत्त्वाचा असल्याने पाकिस्तानबरोबर युद्धविराम केला गेला, त्यासाठी मीच पुढाकार घेतला, असे ट्रम्प सांगत होते. प्रत्यक्षात युद्धविराम आणि व्यापार करार यांचा अर्थाअर्थी संबंध नव्हता, हे करार रेंगाळत गेल्याचे मागेच स्पष्ट झाले. दोन देशांतील करारामध्ये दोघांनाही लवचीकता दाखवावी लागते; मात्र अमेरिकेची यासाठी तयारी नव्हती आणि दोन्ही देशांचे हित साधले जाईल, असाच करार पाहिजे, यावर भारत ठाम राहिला. यानंतर सुरू झालेल्या मानहानीकारक विधानांवर भारताने संयमपूर्ण प्रतिक्रिया दिली. येथील विरोधकांनी त्याचे भांडवल केले तरी जगासमोर अमेरिकेचे ढोंग उघडे पडले, हे मान्य करावे लागेल. 'भारताची गाडी चुकली', असे अमेरिकेच्या मंत्र्याचे विधान होते. युरोपबरोबर झालेल्या करारानंतर अमेरिकेचा जो जळफळाट झाला, ते भारताची नव्हे, तर अमेरिकेची वेळ चुकल्याचे सूचित करणारे होते. काहीही असो, ट्रम्प यांनी निमंत्रित केलेल्या जागतिक अव्यवस्थेच्या स्थितीत व्यापार करार ही भारताचीही गरज होती. कराराचा तपशील आणखी काही दिवसांत स्पष्ट होईल. या करारानुसार ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी उत्पादने भारताला अमेरिकेकडून घ्यावी लागतील आणि आयातीचे हे मूल्य थोडेथोडके नव्हे, तर तब्बल पाचशे अब्ज डॉलर्स राहणार आहे. करारावर झालेल्या सहमतीचा तातडीचा परिणाम म्हणजे भारत आणि अमेरिका यांच्यात निर्माण झालेला तणाव बर्‍याच प्रमाणात निवळणार आहे. अर्थात, ट्रम्प यांचा वाचाळपणा लक्षात घेता दीर्घकाळासाठी काही सांगता येणे अवघड. भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याने आता युक्रेन युद्धाचा शेवट जवळ येईल, असा ट्रम्प यांचा सूर आहे. हे युद्ध आमच्या तेल खरेदीमुळे सुरू राहिले नव्हते, अमेरिकेसह पाश्चात्त्यांना ते हवे होते, हे भारत सुनावू शकेल, अशी शक्यता नाही. आंतरराष्ट्रीय बदलत्या स्थितीमुळे दोन देशांच्या संबंधात चढउतार होत असतात, हे मान्य केले तरी आताचा टप्पा अतिशय धोक्याच्या वळणाचा होता. कराराची औपचारिक घोषणा नजीकच्या काळात होईल; पण दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेले अविश्वासाचे वातावरण कितीही साखरपेरणी केली तरी पूर्ण होणार नाही.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**आहाराचे ट्रेंडस कोणते?**




० तुमच्या आहारात नेहमी कर्बोदकं, प्रथिनं, फॅट्स, जीवनसत्व, खनिजं आणि पाणी या सहा पोषणद्रव्यांचा समावेश असू द्या. ० लहरी आहार टाळा, त्यामुळे मुख्य पोषणदद्रव्यांची कमतरता भासू शकते. ० दररोज सलाड किंवा वेगवेगळी फळं खा, तुमच्या आहारात रिफाइंड आणि प्रोसेस केलेल्या पदार्थांच्या तुलनेत नैसर्गिक पदार्थांचा समावेश जास्त असू द्या. ० आहारात पुरेसं प्रथिनं समाविष्ट करा.

## २ Joke विनोद




एक बाई डॉक्टरांकडे आली. ङकाय होतंय तुम्हाला?फ डॉक्टरांनी विचारले. ङतसं काहीच नाही पण मला एक वाईट सवय आहे.फ ङकोणती?फ ङमी स्वत:शीच दिवसभर बोलत असते.फ ङइतकंच ना!... काळजी करायचं काहीच कारण नाही.फ ङते ठीक आहे हो, पण माझंच बोलणं ऐकून मला किती कंटाळा येतो याची कल्पना आहे का तुम्हाला?फ

## ३ Message संदेश




Child : Mummy why Gandhi has no hair on his head…
Mummy : Because he speak only truth…
Child : Now I understand why ladies have long hair…

## ४ Thought सुविचार



श्रमाने अंगातून गळणारे पाणी गंगेच्या पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो :।**
**नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक:।।**

अर्थ - हंस पांढरा, बगळाही पांढरा, मग हंस आणि बगळा यांच्यात फरक काय? पण दूध आणि पाणी वेगळे करताना हंस हंसच आणि बगळा बगळाच- (ठरतो) (नीरक्षीरविवेक फक्त हंसच करतो.)

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. 'अवजड' झालेले माजी मुख्यमंत्री
८. हल्लीच्या युगात याच्याशिवाय नमस्कार नाही!
११. मजबूत
१२. नेत्र, डोळा
१३. रक्षा
१४. प्रजा
१६. काहींसाठी हे निद्रासन
१७. वन्य जीव
१९. घागरा
२१. कलावंत
२२. मोठी टोपली
२३. अर्जुनाचा रथ चालवणारा श्रीकृष्ण
२४. युद्ध
२७. श्री विष्णूचा बटु अवतार
३०. भांडणातील कळीचा मुद्दा
३२. उत्तराधिकारी
३५. बाजार
३६. तोफगाडी
३८. रविवार
४०. अनुमती
४३. सडेतोड, स्पष्ट
४५. कडक व चिवट
४६. वजनदार, हिंदीत पायाभूत उद्योगाला 'भारी' शब्द
४८. स्वयंप्रकाशी किडा
४९. देव
५०. पोते
५२. महान
५३. हद्दपार
५४. गणपतीचे एक नाव
५५. गुजराथी नृत्यप्रकार
५८. विपुलता, रेलचेल
६०. सुसर
६३. श्री विष्णूचा अष्टाक्षरी मंत्र
६७. धाक, भीती
६९. पातक
७०. गाढव
७१. उदार, देणारा
७२. कुळाशी करारमदार
७४. उत्सवाचे दिवस
७५. स्वीकारच्या विरूद्ध
७६. लोण्यासाठी भांडणारा

### उभे शब्द

१. विस्मरण
२. सदोदित
३. संताप, क्रोध
४. भाजणीपासून बटाट्यापर्यंत कुठलाही असला तरी चवदार
५. मंदवासर
६. खोदकाम
७. करंजी
८. सजीव-निर्जीव सर्व
९. महिरप
१०. रड्या माणूस
१५. योग्य, बरोबर
१६. हिंदीत संशय
१८. असंमती
१९. उद्याच्या नंतरचा दिवस
२०. मोठमोठे पराक्रमी योद्धे
२१. हात
२३. मर्यादा
२४. एक तंतुवाद्य
२५. मृत्यू
२६. शिष्य
२८. अपशकुन
२९. बारीक दगड
३०. व्यायाम
३१. सखोल
३३. सूर्याचे एक नाव
३४. प्रश्नोत्तरे
३७. स्वराचे वरदान लाभलेला
३९. कमळ
४०. दिवंगत ज्येष्ठ खलनायिका, ललिता ---
४१. पूर्वज
४२. कवी
४४. मावा
४६. अपमान
४७. भीती
४८. लोखंड घासण्याचे हत्यार
४९. काजळाचा एक प्रकार
५१. बायको
५३. लोकनाट्य
५६. श्री विष्णूचे एक नाव
५७. बगिचा
५९. मजबूत
६१. रात्र
६२. उलट, विरूद्ध
६४. लंकेचा राजा
६५. बाई
६६. सफल झालेला
६८. फणसाचा एक प्रकार
६९. बासरी
७१. दरवाजा
७३. ठोकताळा, अंदाज

### आडवे उत्तरे

१.विलासराव देशमुख ८.चमत्कार ११.तगर १२.नयन १३.राख १४.रयत १६.शव-ासन १७.वनचर १९.परकर २१.कलाकार २२.हारा २३.पार्थसारथी २४.समर २७.वामना-वतार ३०.कलागत ३२.वारस ३५.हाट ३६.रणगाडा ३८.रविवासर ४०.परव-ानगी ४३.रोखठोक ४५.वातड ४६.अवजड ४८.काजवा ४९.सुर ५०.बारदान ५२.थोर ५३.तडीपार ५४.हेरंब ५५.रासगरबा ५८.मालाम-ाल ६०.मगर ६३.नारायण नारायण ६७.जरब ६९.पाप ७०.खर ७१.दानी ७२.रयतवारी ७४.सणवार ७५.अस्वीकार ७६.बोका

### उभे उत्तरे

१.विसर २.सतत ३.राग ४.वडा ५.शनिवार ६.खनन ७.कानवला ८.चराचर ९.मखर १०.रडराऊत १५.यथार्थ १६.शक १८.नकार १९.परवा २०.रथीमहारथी २१.कर २३.पारावार २४.सतार २५.मरण २६.चेला २८.नाट २९.खडा ३०.कसरत ३१.गहन ३३.रवि ३४.सवालजबाब ३७.गायक ३९.सरोज ४०.पवार ४१.वाडवडील ४२.गीतकार ४४.खवा ४६.अवहेलना ४७.डर ४८.कानस ४९.सुरमा ५१.दारा ५३.तमाशा ५६.रमण ५७.बाग ५९.कणखर ६१.रजनी ६२.विपरीत ६४.रावण ६५.नार ६६.यशस्वी ६८.बरका ६९.पावा १.दार ७३.तर्क



# क्रीडा विश्व



चीनमधील शेडोंग प्रांतात सुरू असलेल्या बॅडमिंटन आशिया टीम चॅम्पियनशिपमध्ये भाग घेताना सिंगापूरची इन्सिरा खान.

## नंदीनी शर्माची भेदक गोलंदाजी: ३ विकेट्स घेतल्या



**वडोदरा :** महिला प्रीमियर लीगच्या चौथ्या हंगामातील स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहचली आहे. अ‍ॅश्ले गार्डनरच्या नेतृत्वाखालील गुजरात जायंट्स विरुद्ध जेमिमा रॉड्रिग्सचा दिल्ली कॅपिटल्स संघ यांच्यात फायनलमध्ये एन्ट्री मारण्यासाठी एलिमिनेटर सामना खेळवला जाणार आहे. वडोदरा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगणार्या सामन्यातील विजेता ५ फेब्रुवारीला होणार्या अंतिम सामन्यात यंदाच्या हंगामातील टेबल टॉपर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी फायनलमध्ये खेळताना दिसेल.

दिल्ली कॅपिटल्सने साखळी फेरीतील आपल्या अखेरच्या सामन्यात वॉरियर्स विरुद्ध थरारक विजय नोंदवत प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला. या विजयासह त्यांनी गतविजेत्या मुंबई इंडियन्सला स्पर्धेबाहेर फेकले. या सामन्यात मरिझान कॅप हिने भेदक गोलंदाजी करत ३० धावा खर्च करत ३ विकेट्स घेतल्या होत्या. फलंदाजीत कर्णधार जेमिमा रोड्रिग्स हिने संयम दाखवत १८ चेंडूत ३४ धावांची बहुमूल्य खेळी साकारली होती. गुजरात जायंट्सने साखळी फेरीतील आपल्या शेवटच्या सामन्यात गतविजेत्या चख संघावर मात करत एलिमिनेटरमध्ये धडक मारली. इतिहासात पहिल्यांदाच त्यांनी पराभूत करत नवा इतिहास रचला. अ‍ॅश्ले गार्डनर (४६) आणि जॉर्जिया वेअरहॅम (४४) या दोघींनी संघाला प्लेऑफ्समध्ये नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

गुजरात जाएंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील एलिमिनेटर सामना वडोदराच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार, सायंकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी या सामन्याला सुरुवात होईल. टेलिव्हिजनवर स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर या सामन्याचे थेट प्रेक्षपण करण्यात यणार असून जिओहॉटस्टार ॲप आणि वेबसाइटवर लाईव्ह स्ट्रिमिंगच्या माध्यमातून क्रिकेट चाहते या सामन्याचा आनंद घेऊ शकतात.

## रोहित-विराट २०२७ चा वर्ल्डकप खेळणार का?

दिल्ली-भारताचे अनुभवी फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दोघेही केवळ वनडे क्रिकेट संघाचा भाग आहेत. एकच फॉरमॅट खेळून सुद्धा दोघांच्या फलंदाजीतील धार काही कमी झालेली नाही. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही बलाढ्य संघांविरूद्ध झालेल्या मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोन्ही अनुभवी फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला होता. दोघेही वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेनंतर निवृत्ती घेणार, असं म्हटलं जात आहे. दरम्यान विराट आणि रोहित ही जोडी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळणार का? याबाबत भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीला प्रश्न विचारण्यात आला होता. यावर एमएस धोनीने दिलेलं उत्तर सध्या तुफान चर्चेत आहे.भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीने नुकताच एका खाजगी कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमातील चर्चेदरम्यान त्याला, विराट कोहली आणि रोहित शर्मा ही जोडी वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळणार का? याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर आपली प्रतिक्रिया देताना धोनी म्हणाला, ''त्यांनी पुढचा वर्ल्ड कप का खेळू नये? माझ्यासाठी वय हा कोणताही निकष नाही. कामगिरी आणि फिटनेस सर्वात महत्त्वाचे आहे. मला वाटतं की कोणालाही काही सांगण्याची गरज नाही, पण गोष्टी स्पष्ट असायला हव्या. प्रत्येकासा समान वागणूक दिली गेली पाहिजे.'' तसेच एमएस धोनीने खेळाडूंना आपल्या कामगिरीवर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला दिला आहे. तो म्हणाला, ''जर ते चांगली कामगिरी करत असतील आणि त्यांच्या मनात देशासाठी सातत्याने चांगलं करण्याची जिद्द असेल, तर का नाही? तुम्हाला अनुभवी खेळाडू कसे मिळणार? जोपर्यंत तो सचिन तेंडुलकर नाही, तोपर्यंत तुम्ही २० वर्षांच्या खेळाडू कडून अपेक्षा करू शकत नाही. प्रत्येकाला समान लेखलं पाहिजे. जर ते चांगली कामगिरी करत असतील, तर ते नक्कीच संघात असतील.''विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी आपल्या दमदार कामगिरीच्या बळावर संघातील स्थान कायम ठेवलं आहे. विराटने ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात नाबाद ७४ धावांची खेळी केली होती. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या मालिकेत त्याने लागोपाठ २ शतके आणि १ अर्धशतक झळकावले होते.



### महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीबाबत आला सर्वोच्च निर्णय

मुंबई-महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे.रोहित पवारांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन ताब्यात ठेवण्यासाठी सुमारे चारशे नव्या सदस्यांची नोंदणी केली आहे. नोंदणी करताना नियमांचं उल्लंघन झाल्याचा ठपका मुंबई उच्च न्यायालयाने ठेवला. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने योग्य ठरवला. रोहित पवार यांच्या कुटुंबातील सदस्य, त्यांचा मित्र परिवार, नातलग आणि त्यांच्या प्रभावातील इतर सदस्य, अगदी त्यांच्याच कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांचा भरणा नव्या मतदारांमध्ये असल्याचा आरोप माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी केला होता. केदार जाधवांच्या या आरोपात तथ्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने पुराव्यांची छाननी केल्यानंतर मान्य केले होते. हा निर्णय पण सर्वोच्च न्यायालयाने योग्य ठरवला. सरन्यायाधीशांनी तर मफ्ही फसवणूक आहेफ्र इथपर्यंत कडक शब्दांचा वापर करत रोहित पवारांची एकप्रकारे कानउघाडणी केली आहे.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय पोरांनी इतिहास घडवला! अंडर-१९ वर्ल्डकपमध्ये रेकॉर्डब्रेक 'रन चेज'

मुंबई-आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सेमीफायनलचा सामना भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांवर चांगलाच हल्लाबोल केला. अफगाणिस्तानकडून फलंदाजी करताना २ फलंदाजांनी दमदार शतकं झळकावली. या शतकांच्या बळावर अफगाणिस्तानने ४ गडी बाद ३१० धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघालाही चांगल्या सुरूवातीची गरज होती. भारतीय संघाकडून सलामीला आलेल्या आरोन जॉर्जने दमदार शतकी खेळी केली. तर आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशीने अर्धशतक झळकावून मोलाचं योगदान दिलं.

### जॉर्जचे धमाकेदार शतक, ३११ धावांचे विक्रमी लक्ष्य

हरारे,-१९ वर्षाखालील विश्वचषकाच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात, भारतीय क्रिकेट संघाने १९ वर्षाखालील विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक लक्ष्याचा पाठलाग केला आणि अंतिम फेरीत स्थान मिळवलं. टीम इंडियानं अफगाणिस्तानविरुद्ध ३११ धावांचा विक्रमी पाठलाग केला, फक्त ३ विकेट्स गमावल्या आणि सामना ७ विकेट्सनं सामना जिंकला. यासह, भारतानं विक्रमी १०व्यांदा स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. टीम इंडियासाठी या सामन्याचा हिरो सलामीवीर आरोन जॉर्ज होता, ज्यानं दबावानं भरलेल्या सामन्यात शानदार शतक झळकावलं. टीम इंडिया आता अंतिम फेरीत इंग्लंडविरुद्ध ६ फेब्रुवारीला भिडेल.आरोन जॉर्जच्या शतकानं भारताचा विजय : अफगाणिस्तानविरुद्धच्या उपांत्य सामन्यात टीम इंडिया ३११ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करत असली तरी, पहिल्याच षटकापासून संघ कधीही दबावाखाली दिसत नव्हता.

### अंडर-१९ वर्ल्डकप फायनलचे दोन्ही संघ ठरले! केव्हा अन् कुठे होणार सामना? जाणून घ्या

मुंबई-आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश करणारे दोन्ही संघ ठरले आहेत. या स्पर्धेतील सेमीफायनल फेरीतील दुसरा सामना भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात अफगाणिस्तानने भारतीय संघासमोर विजयासाठी विक्रमी ३११ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने ५३ चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवला. यासह दहाव्यांदा या स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघाचा फायनलचा सामना इंग्लंडविरूद्ध होणार आहे. दरम्यान हा सामना लाईव्ह केव्हा, कुठे आणि कधी पाहता येणार? जाणून घ्या. या स्पर्धेतील फायनलमध्ये जाणारे दोन्ही संघ ठरले आहेत. भारतीय संघाने अफगाणिस्तानला पराभूत करून स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे.

## भारत दहाव्यांदा यु१९ वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये, अफगाणिस्तानवर ७ विकेटनं विजय,भारत आणि इंग्लंड यांच्यात रंगणार अंतिम सामना

हरारे-आयुष म्हात्रेच्या नेतृत्त्वात टीम इंडियानं अंडर १९ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारताने उपांत्य फेरीच्या लढतीत अफगाणिस्तानला ७ विकेटने पराभूत केले. भारताने हरारे स्पोर्टस क्लब येथील मैदानावर ३११ धावांचे आव्हान ४१.१ ओव्हरमध्ये पूर्ण केलं. अंडर १९ वर्ल्ड कपमध्ये ३११ धावांचा यशस्वी पाठलाग करणारा भारत हा पहिला संघ ठराल आहे. आता भारत आणि इंग्लंड यांच्यात उपांत्य फेरीचा सामना शुक्रवारी होणार आहे.

भारताकडून एरोन जॉर्ज यानं शतकी खेळी केली. वैभव सूर्यवंशी आणि एरोन जॉर्ज या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ९० धावांची भागिदारी केली. वैभव सूर्यवशी ३३ बॉलमध्ये ९ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीनं ६८ धावा करुन बाद झाला. दहाव्या ओव्हरमध्ये नूरिस्तानी उमरजई याच्या गोलंदाजीवर तो बाद झाला. तर, एरोन जॉर्ज यानं ११५ धावांची खेळी करत भारताच्या विजयात महत्त्वाची कामगिरी बजावली. तर, आयुष म्हात्रे यानं देखील अर्धशतक केले.

भारताचा कॅप्टन आयुष म्हात्रेयाने ५९ बॉलमध्ये ६२ धावा केल्या. यात त्याने ५ षटकार आणि ४ षटार मारले. विहान मल्होत्रा यानं ४७ बॉलमध्ये ३८ धावा केल्या. तर, वेदांत त्रिवेदी याने नाबाद ५ धावा केल्या.

भारतानं दहाव्यांदा अंडर १९ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम सामना ६ फेब्रुवारीला होणार आहे. भारत आणि इंग्लंड अंतिम सामन्यात आमने सामने येतील. भारतानं पाच वेळा अंडर १९ वर्ल्ड कप जिंकला आहे. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ५० ओव्हरमध्ये ४ विकेटवर ३१० धावा केल्या. अंडर १९ वर्ल्ड कपमध्ये पहिल्यांदा एखाद्या संघानं भारताविरोधात ३०० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. फैसल शिनोजादा आणि उजैरुल्लाह नियाजई या दोघांनी शतक केलं. अफगाणिस्ताननं चांगली सुरुवात केली.

### पाकिस्तानकडून २३०० कोटींचा दंड वसूल करणार?

मुंबई : आगामी आयसीसी टी२० पुरुष विश्वचषक २०२६ सुरू होण्यापूर्वीच क्रिकेट विश्वात खळबळ उडाली आहे. पाकिस्तान सरकारने आपल्या क्रिकेट संघाला विश्वचषकात सहभागी होण्याची परवानगी दिली असली, तरी १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये होणार्या भारताविरूद्धच्या महामुकाबल्यावर बहिष्कार टाकण्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे. पाकिस्तानच्या या आडमुठ्या भूमिकेमुळे आयसीसी संतापली असून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आतापर्यंतचा सर्वात मोठा दंड सोसावा लागण्याची शक्यता आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हा केवळ खेळ नसून तो जागतिक क्रिकेटसाठी कमाईचा सर्वात मोठा स्रोत आहे. हा सामना रद्द झाल्यास ब्रॉडकास्टर्स, जाहिरातदार आणि तिकीट विक्रीतून मिळणार्या सुमारे २५० दशलक्ष डॉलर्स (सुमारे २,३०० कोटी रुपये) महसुलावर पाणी फेरले जाईल.

## टीम इंडियाच्या हातून जाणार अंडर १९ वर्ल्ड कप! सेमी फायनलमधील ५ चूका महागात पडणार

मुंबई-अंडर १९ वनडे वर्ल्डकपच्या दुसऱ्या क्वार्टर फायनल सामन्यात अफगाणिस्तानच्या संघाने टीम इंडियाची अक्षर धुलाई केली आहे.या धुलाईमुळे अफगाणिस्तानने ५० ओव्हरमध्ये ४ विकेट गमावून ३१० धावा केल्या आहेत.त्यामुळे आता टीम इंडियाला फायनलमध्ये पोहोचण्यासाठी ३११ धावा कराव्या लागणार आहेत.अफगाणिस्तानने दिलेले हे धावांचे आव्हान खूपच जास्त आहे, त्यामुळे टीम इंडियासमोर फायनलमध्ये पोहोचण्याचे मोठे आव्हान असणार आहे. दरम्यान या सामन्यात टीम इंडियाकडून कोणत्या चूका झाल्या? हे जाणुन घेऊयात.

सामन्यात बॉलरने टाकलेला एक बॉल विकेटमागे ठेवलेल्या अभिग्यान कुंडूच्या हेल्मेटला लागला. नियमानुसार तर हेल्मेटमुळे बॉल अडवला गेला तर फलंदाजी करणाऱ्या टीमला पाच धावा पेनेल्टी म्हणून देण्यात येतात.

भारताच्या उत्कूष्ट गोलंदाजीविरूद्ध अफगाणिस्तानच्या दोन खेळाडूंनी शतक ठोकली होती. अफगाणिस्तानच्या फैसलने ९३ बॉलमध्ये ११० धावांची शतकीय खेळी केली. या खेळीत त्याने १५ चौकार मारले होते. त्याच्यासोबत उझेरूल्लाह निझाने ८६ बॉलमध्ये १०६ धावांची खेळी केली होती.या दोन शतक टीम इंडियाच फायनलच तिकीट कापू शकतात.

सेमी फायनल सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार आयुश म्हात्रे कॅप्टन्सीत फेल ठरला आहे. या सामन्यात आयुश म्हात्रे गोलंदाजांचे वेगळं नियोजन करता आले नाही. आयुशने फक्त पाच बॉलर वापरले त्याच स्वत:ही गोलंदाजी केली पण फक्त दोन ओव्हर टाकल्या. आणखी ओव्हर टाकल्या असत्या तर कदाचित त्याला विकेच मिळण्याची शक्यता बळावली असती.कारण मागच्या वेळेस त्याने दोन विकेट काढल्या होत्या. तसेच सेमी फायनल सामन्यात टीम इंडियाचे दोन विकेट टेकर गोलंदाजांना विकेटच मिळाली नाही. हेनील पटेलने मागच्या पाच सामन्यात ११ विकेट घेतल्या होत्या तर आर अम्ब्रीशने ८ विकेट घेतल्या होत्या. या दोन्ही खेळाडूंना विकेट न मिळाल्याने अफगाणिस्तान ३०० पार धावा केल्या होत्या.

मागच्या सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानचा पराभव केला होता. या पराभवानंतर टीम इंडिया हवेत गेली होती. त्याच ओव्हर कॉन्फिडन्सने टीम इंडिया अफगाणिस्तानविरूद्ध खेळली याचा त्यांना या सामन्यात फटका बसल्याचे दिसते.

दुसऱ्या क्वार्टर फायनल सामन्यात अफगाणिस्तानने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता.हा निर्णय अफगाणिस्तानने योग्यही करून दाखवला कारण त्यांच्या डावाची सूरूवात खूपच चांगली झाली होती. अफगाणिस्तानकडून ओस्मान सदत आणि खालीद अहमदझाई फलंदाजीला उतरले होते. दोघांनी अफगाणिस्तानच्या डावाची चांगली सुरूवात केली होती पण दोघांनाही मोठ्या धावा करता आल्या नाही. अफगाणिस्तानकडून सलामीवर ओसमान सदतने ३९ धावांची तर खालीदने ३१ धावांची सर्वाधिक खेळी केली. त्यानंतर फैसल शिनोझादा आणि उझेरूल्लाह निझाईने अफगाणिस्तानचा डाव सावरला होता. दोघांनी यावेळी टीचून फलंदाजी करून २० ओव्हर भारताला विकेटच काढून दिली नव्हती. या दरम्यान फैसलने ९३ बॉलमध्ये ११० धावांची शतकीय खेळी केली. या खेळीत त्याने १५ चौकार मारले होते. त्याच्यासोबत निझाने १०१ धावांची शतकीय खेळी केली होती. या खेळीच्या बळावर आता अफगाणिस्तानने ५० ओव्हरमध्ये ४ विकेट गमावून ३१० धावा केल्या आहेत.त्यामुळे आता टीम इंडियाला फायनलमध्ये पोहोचण्यासाठी ३११ धावा कराव्या लागणार आहेत.

## भारतीय संघ फायनलमध्ये दाखल; वैभव आणि जॉर्जच्या वादळापुढे अफगाणिस्तानची दाणादाण

मुंबई-भारतीय क्रिकेट संघ अंडर-१९ वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात दाखल झाला आहे. भारताने सेमी-फायलनमध्ये अफगाणिस्तानचा अत्यंत सहजपणे पराभव केला. अफगाणिस्तानने ३११ धावांचे लक्ष्य दिले असताना, वैभव सूर्यवंशीच्या वादळाने त्यांची दाणादाण वाढवली. वैभव सूर्यवंशीने शानदार खेळी करत ३३ चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह ६८ धावा केल्या. या खेळीनंतर अफगाणिस्तानने दिलेले ३११ धावांचं लक्ष्यही भारतीय संघासमोर ठेंगणे वाटू लागले होते. भारताने ४१.१ ओव्हरमध्येच विजयावर शिक्कामोर्तब केले. ७ गडी राखून भारताने हा सामना जिंकत दिमाखात फायलनमध्ये प्रवेश केला आहे. अंडर-१९ वर्ल्डकपचा अंतिम सामना ६ फेब्रुवारीला खेळला जाणार आहे. यावेळी भारतीय संघासमोर इंग्लंडचं आव्हान असणार आहे. इंग्लंडने सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी पराभव केला होता.

वैभव सूर्यवंशी आणि एरॉन जॉर्ज यांनी भारतीय संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ९० धावांची भागिदारी केली. वैभवने केवळ २४ चेंडूत ७ चौकार आणि तीन षटकार ठोकत आपले अर्धशतक पूर्ण केले. तथापि, वैभव त्याच्या अर्धशतकानंतर जास्त काळ टिकला नाही. त्याने ३३ चेंडूत नऊ चौकार आणि चार षटकारांसह ६८ धावा केल्या. एरॉन जॉर्ज शेवटपर्यंत टिकला आणि १०४ चेंडूत ११५ धावा केल्या.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानने ४ गडी गमावत ३१० धावा केल्या. अफगाणिस्तान संघाला चांगली सुरुवात मिळाली होती. उस्मान सादत आणि खालिद अहमदझाई यांनी पहिल्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी केली. दीपेश देवेंद्रनने खालिदला (३१) बाद करून ही भागीदारी संपुष्टात आणली. त्यानंतर उस्मान सादत आणि फैसल शिनोजादा यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६४ धावा जोडल्या. फैसल शिनोजादा आणि उजैरुल्लाह नियाझाई यांनी भारतीय गोलंदाजांना चांगलाच त्रास दिला. त्यांनी तिसऱ्या विकेटसाठी १४८ धावांची भागीदारी केली. शिनोजादा यांनी ९३ चेंडूत १५ चौकारांसह ११० धावा केल्या. उजैरुल्लाह नियाझाईने ८६ चेंडूत १२ चौकार आणि दोन षटकारांसह १०१ धावांची नाबाद खेळी केली. भारतीय संघाकडून कनिष्क चौहानने सर्वाधिक २ विकेट बळी घेतले.



# मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांकडून संरक्षा पुरस्कार प्रदान

**मुंबई/प्रतिनिधी :** श्री प्रतीक गोस्वामी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी ०३.०२.२०२६ रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या १२ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार प्रदान करून त्यांचा सत्कार केला.

कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दाखविलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे संभाव्य अपघात टळले व मागील काही महिन्यांत सुरक्षित रेल्वे संचालन सुनिश्चित झाले. या उल्लेखनीय कार्याच्या मान्यतेस्वरूप हे संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तीपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा उल्लेख असलेले प्रशस्तिपत्र आणि रु ३,५००/- रोख पारितोषिक यांचा समावेश आहे.

**पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचा तपशील:**

**मुंबई विभाग:** श्री लक्ष्मण रघुनाथ जाखरे, काँटेवाला, आटगाव, मुंबई विभाग यांनी ०२.०१.२०२६ रोजी कर्तव्यावर असताना एका प्रवाशाला उपनगरी गाडीत चढताना प्लॅटफॉर्म आणि गाडीच्या दरम्यान पडताना पाहिले. त्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून त्या प्रवाशाला संभाव्य गंभीर अपघातापासून वाचवले. त्यांच्या सतर्कता आणि त्वरित कृतीमुळे अनुचित घटना टळली.

श्री पंढरीनाथ सोमा नाडेकर, ट्रेन व्यवस्थापक, कल्याण, मुंबई विभाग यांनी ०८.०१.२०२६ रोजी कर्तव्यावर असताना चणउघ विशेष गाडीतून धूर निघताना आढळला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली व वेळेत आवश्यक कार्यवाही करण्यात आली. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य गंभीर घटना टळली.

श्री रणजीत कुमार यादव, हेल्पर (एस अँड टी), ठाणे, मुंबई विभाग यांनी ०८.०१.२०२६ रोजी नियमित तपासणीदरम्यान कि.मी. ३१/५१५ येथे रेल्वे रुळाला तडा गेलेला आढळला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती देऊन दुरुस्तीची खात्री केली व संभाव्य अपघात टाळला.

**नागपूर विभाग:** श्री अनुराग श्रीवास्तव, सहाय्यक काँटेवाला, तडाली, नागपूर विभाग यांनी ०८.१२.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना धावत्या मालगाडीतून ईएम पॅडमधून ठिणग्या निघताना दिसल्या. त्यांनी तात्काळ गाडी थांबवून संबंधित सर्वांना माहिती दिली, त्यामुळे संभाव्य अपघात टळला.

श्री प्रदीप निर्मळ, हेल्पर (एस अँड टी), आमला, नागपूर विभाग यांनी



०२.०१.२०२६ रोजी कर्तव्यावर असताना पॉइंट क्रमांक १३९/बी च्या टंग रूळामध्ये नुकसान आढळले. त्यांनी त्वरित संबंधितांना माहिती दिली व वेळेत करण्यात आलेल्या कार्यवाहीमुळे संभाव्य अपघात टळला.

श्री उमेश मौर्य, लोको पायलट (शंटर), घुग्घुस, नागपूर विभाग यांनी १६.१२.२०२५ रोजी शंटिंग कार्यादरम्यान रेल्वे रुळाला तडा गेलेला आढळला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली, त्यामुळे संभाव्य अपघात टळण्यास मदत झाली.

**भुसावळ विभाग:** श्री फुल कुमार गौतम, लोको पायलट (गुड्स), भुसावळ यांनी १९.०१.२०२६ रोजी गाडी क्रमांक १२४०६ वर कर्तव्यावर असताना कि.मी. ७७४/११-१९ दरम्यान ट्रॅक मेंटेनरला रुळांवर काम करताना दिसला. त्यांनी त्याला सतर्क करण्यासाठी शिटी दिली; मात्र ट्रॅक मेंटेनर रुळांवरून दूर न गेल्यामुळे त्यांनी तात्काळ आपत्कालीन ब्रेक लावून गाडी थांबवली. त्यांच्या सतर्कता व त्वरित कृतीमुळे ट्रॅक मेंटेनरचे प्राण वाचले.

श्री राहुल चंदा, एमएसएम (कॅरेज अँड वॅगन), भुसावळ यांनी ०९.०१.२०२६ रोजी कर्तव्यावर असताना मालगाडीच्या तपासणीदरम्यान एका डब्याच्या बोगी बोल्स्टरमध्ये दोष आढळला. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली व संभाव्य अपघात टाळला.

श्री विजय सुरडकर, कॉन्स्टेबल (आरपीएफ), जळगाव, भुसावळ विभाग यांना ०२.१२.२०२५ रोजी जळगाव स्थानकावर कर्तव्यावर असताना गाडी क्रमांक १२१११ मध्ये चढताना एक प्रवासी पडताना दिसला. त्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून त्या प्रवाशाला गंभीर दुखापतीपासून वाचवले. त्यांच्या प्रसंगावधान आणि त्वरित कृतीमुळे अनुचित घटना टळली.

**सोलापूर विभाग:** श्री उमेश रमेश बदर, कनिष्ठ अभियंता (टीआरडी), कुर्डुवाडी, सोलापूर विभाग यांना ०३.११.२०२५ रोजी पायी गस्तीदरम्यान कि.मी. ३७३/०८ येथे जी जंपर तुटलेला आढळला. त्यांनी त्वरित संबंधित सर्वांना माहिती देऊन ट्रॅकची संरक्षा सुनिश्चित केले व संभाव्य अपघात टाळला.

श्री भानुदास एन. शेळके, ट्रॅक मेंटेनर, अरग, सोलापूर विभाग यांना ३०.१२.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना धावत्या मालगाडीच्या एका डब्याचे चाक सपाट (फ्लॅट टायर) झाल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ संबंधितांना माहिती दिली व वेळेत करण्यात आलेल्या कार्यवाहीमुळे संभाव्य अपघात टळला.

**पुणे विभाग:** श्री कंचन कुमार, वरिष्ठ विभाग अभियंता (पी.वे), सांगली, पुणे विभाग यांना १४.०१.२०२६ रोजी तपासणीदरम्यान मालगाडीच्या एका डब्याचे चाक सपाट (फ्लॅट टायर) झाल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली व संभाव्य अपघात टाळला.

महाव्यवस्थापक यांनी सर्व पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे कर्तव्यनिष्ठा आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले तसेच त्यांच्या कृतीमुळे इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही सतर्क राहून प्रवाशांची सुरक्षितता व रेल्वे मालमत्तेचे संरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी श्री चंद्रकिशोर प्रसाद, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी तसेच इतर प्रधान विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कष्ट, सातत्य आणि चारित्र्यातूनच उमलतात यशाची स्वप्ने; मनपा.आयुक्त मानसी मीना

**लातूर/प्रतिनिधी :** ''निरोप म्हणजे रुखरुख नसून नव्या प्रवासाची सुरुवात असते. तुम्ही आता खऱ्या अर्थाने जीवनाच्या मैदानात उतरत आहात. केवळ गुणांच्या शर्यतीत स्वतःला हरवून न घेता, एक संवेदनशील व चांगला माणूस बनण्याला प्राधान्य द्या. चित्तशुद्धी, बुद्धिमत्ता आणि कष्टांचे सातत्य असेल, तर जगातील कोणतीही शक्ती तुम्हाला यशापासून रोखू शकत नाही,'' असे प्रेरणादायी प्रतिपादन लातूर महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांनी केले.

दयानंद कला महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आयुक्त मानसी मीना उपस्थित होत्या, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.

मार्गदर्शन करताना आयुक्त मानसी मीना पुढे म्हणाल्या की, ''लातूरची ओळख शैक्षणिक गुणवत्तेसाठी संपूर्ण



महाराष्ट्रात आहे. तुम्ही या गुणवत्तेच्या परंपरेतून घडलेले विद्यार्थी आहात. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी दूरवर भटकंती करण्याची गरज नाही. स्वतःची ओळख जपा, स्वतः वर विश्वास ठेवा आणि स्वतःला सिद्ध करा.'' विद्यार्थ्यांमधील गायन, नृत्य, क्रीडा यांसारख्या सुप्त गुणांची जोपासना करण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, ''आयुष्यात जी कमिटमेंट कराल, तिला पूर्ण ताकदीने सामोरे जा. परीक्षेचा ताण न घेता जे काही कराल, त्यात शंभर टक्के योगदान द्या, कारण श्रमाला कोणताही पर्याय नाही.''

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना आयुक्त मानसी मीना यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आयएएस व आयपीएस होण्यासाठी आतापासूनच तयारी करण्याचा सल्ला दिला. यावेळी त्यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा करत सांगितले की, ''दयानंद शिक्षण संस्थेतील जो विद्यार्थी आयएएस किंवा आयपीएसची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होईल, त्याच्या पुढील सर्व शैक्षणिक व पालकत्वाची जबाबदारी संस्था स्वीकारेल.''आदर्श नागरिक घडविणारे महाविद्यालय म्हणून दयानंद कला महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. बारावीच्या सराव परीक्षा, विद्यार्थ्यांना दिले जाणारे मार्गदर्शन यांची माहिती देताना त्यांनी अभिमानाने सांगितले की, ''या महाविद्यालयाने आजवर महाराष्ट्राला ३८ दूरचित्रवाणी कलाकार आणि ४२ प्रशासकीय अधिकारी दिले आहेत.''

या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता कांबळे व संजीवनी कुरे यांनी केले, तर आभार वैष्णवी पाठक हिने मानले.विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी या निरोप समारंभाची अत्यंत उत्साहात सांगता झाली.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये स्पोर्ट डे उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये स्पोर्ट डे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महेश पाळणे, श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, श्रीकृष्ण शिंदे, त्रिवेणी शिंदे, सागर बस्तापुरे, शुभांगी बस्तापुरे, गजानन काकडे, अर्चना काकडे, पुरषोत्तम पाटे, रंजना पाटे, प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, क्रीडा शिक्षक सजित तांबोळी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. सर्व प्रथम शाळेचे विद्यार्थी स्नेहल बारगजे, शिवांश सुरवसे, विराज आलमले, शौर्या चेवले, हर्षदा सर्जे, जयेश वाघमारे, समर्थ गिरी, वेदिका चव्हाण, समर्थ नागरगोजे, हर्ष गावकरे, स्वरा सोळुंके, कार्तिकी पुजारी, आरोही वाघमारे, वैष्णवी बरुरे, जागृती माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून त्यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना दिली. शाळेचे सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा ज्योतीसह संचलन करून उपस्थित पालकांना सलामी दिली. उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे महेश पाळणे यांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतूक केले. त्यांनी सर्वांनी फिजिकली फिट राहणे आवश्यक आहे त्यासाठी खेळणे आवश्यक आहे.

# महावितरणच्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ वीजग्राहकांनी स्विकारला

## पर्यावरणस्नेही 'गो-ग्रीन' वीजबिलांचा पर्याय, २८ लाख २७ हजार रूपयांचा आर्थिक फायदा

**लातूर/प्रतिनिधी :** वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ईमेल' व 'एसएमएस' चा पर्याय निवडणाऱ्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ लघुदाब वर्गवारीतील वीजग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेचा लाभ घेतला आहे. या वीजग्राहकांना २८ लाख २७ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल अॅप व www.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी केले आहे.




वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला परिमंडलात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत २३ हजार ५६६ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या मध्ये लातूर मंडळातील लातूर विभागातील ५ हजार ७९१ वीजग्राहक, उदगीर विभागातील २ हजार ८०७ वीजग्राहक तर निलंगा विभागातील १ हजार ६८६ वीजग्राहक सहभागी झाले आहेत. तसेच धाराशिव मंडळातील धाराशिव विभागातील ३ हजार ४८८, तूळजापूर विभागातील १ हजार ८०८ वीजग्राहक त्याचबरोबर बीड मंडळातील बीड विभागातील ४ हजार १३४ तर अंबाजोगाई विभागातील ३ हजार ८५२ वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या सर्व सहभागी ग्राहकांना वार्षीक १२० रूपयांची सुट वीजबिलात मीळत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# लातूर ग्रामीण भाजपचे प्रमुख पदाधिकारी अनंत कणसे यांची भाजपला सोडचिठ्ठी

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते काँग्रेस मध्ये केला जाहीर प्रवेश

**मुरूड/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीणमधील महामंत्री तथा मुरूड ग्रामपंचायत सदस्य अनंत कणसे यांनी आपले सहकारी रामकृष्ण कर्ण पुदाले,विनोद पुदाले,सुभान सय्यद,रंजित धाकतोडे, इर्शाद तांबोळी,चंद्रकांत निचळे,अमोल पिंपरे,महाविर टिळक व शेकडो समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ मुरूड येथे आयोजित सभेत, लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी बोलताना अनंत कणसे म्हणाले की, ''मागील बावीस वर्षांपासून मी भाजपमध्ये निष्ठेने काम करत आलो आहे मात्र पक्षात कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नव्हती. मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांची कदर न करता, त्यांना डावलले जात होते.'' विकासाचे राजकारण करण्याऐवजी लातूर ग्रामीणचे आमदार केवळ देशमुख कुटुंबाविरोधात द्वेषाचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यामागे धिरज विलासराव देशमुख यांचे नेतृत्व, विकासाची दृष्टी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना दिले जाणारे प्रोत्साहन हे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, शेतकरी, युवक आणि महिलांसाठी ठोस काम करणारा पक्ष म्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते,'' असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी अनंत कणसे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. ते म्हणाले, ''काँग्रेस हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येकाला येथे सन्मान मिळतो. येणाऱ्या



काळात लातूर ग्रामीणचा विकास अधिक गतीने करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल.''या पक्षप्रवेशामुळे लातूर ग्रामीण तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास काँग्रेसचे पदाधिकारी, स्थानिक नेते, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सभेदरम्यान काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# मुक्तांगणच्या चिमुकल्यानी साजरा केला स्पोर्टडे उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** विशाल नगर येथील साई मंदिरा समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कुलच्या चिमुकल्यांचा स्पोर्ट डे मोठया उत्साहात लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल च्या प्रांगणात साजरा केला.

याप्रसंगी श्रीकृष्ण लाटे,कविता लाटे, प्रवीण यादव, पूजा यादव, भारत आंधळे, भाग्यश्री आंधळे, अमोल तट, योगिता तट, महेश सावंत, हर्षदा सावंत, सोनाली बनसोडे, मुक्तांगण इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या सुमेरा शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सर्व प्रथम शाळेचे विद्यार्थी वरद विकास झांबरे, सई अमोल तट, गौरवी महेश सावंत, गौरवी प्रवीण यादव, सान्वी भारत आंधळे, समर्थ संतोष जाधव, आराध्या राहुल बनसोडे, कार्तिकी विलास सोमवंशी, राजवीर रविकांत माने या चिमुकल्यांनीआपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत



प्रज्वलितकरून व फित कापून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी मुक्तांगणच्या चिमुकल्याना क्रीडा ज्योत प्रदान केली व मुक्तांगणच्यासर्व चिमुकल्याणी क्रीडा ज्योतीसहसंचलन करून उपस्थित पालकांना सलामी दिली.

उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे मार्गदर्शन करत असताना पालकांनी मैदानी खेळाला महत्व देणे काळाची गरज आहे. ते पुढे म्हणाले पालकांनी लहान गटातील विद्यार्थ्यांना

रोज किमान एक तास खेळण्यास दिला पाहिजे असे अवाहन केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांची रनिंग रेस, लेमन स्पून, सॅक जंप, फ्रॉग जंप, म्युझीकल चेअर या स्पर्धा सर्व वर्गांसाठी घेण्यात आल्या.या स्पर्धेत विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.प्रथम विजेत्या विद्यार्थ्यास गोल्ड मेडल, द्वितीय विद्यार्थ्यास सिल्व्हर मेडल व तृतीय विद्यार्थ्यास ब्राँझ मेडल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले.

पालकांनी रनिंग रेस, लेमन स्पून, म्युझीकल चेअर या स्पर्धेत उत्सफूर्तपणे सहभाग नोंदवून त्यांच्या बालपणाच्या भावविश्वात रमले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१



# सरस्वती'च्या विद्यार्थिनींना आनंदीबाई जोशी पुरस्कार

## स्काऊट गाइडच्या राज्य शिबीरात शिस्तेच दर्शन



तामलवाडी(प्रतिनिधी)-तामलवाडी तुळजापूर तालुक्यातील सरस्वती विद्यालय, तामलवाडी येथील विद्यार्थिनींनी स्काऊट-गाइड चळवळीच्या माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन करत आनंदीबाई जोशी स्काऊट पथकाचा मानाचा राज्य पुरस्कार प्राप्त केला आहे. राज्य प्रशिक्षण केंद्र, लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्य पुरस्कार चाचणी शिबिरात विद्यालयातील नऊ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवत आपल्या गुणवत्तेची आणि क्षमतेची राज्यस्तरावर ठसठशीत छाप उमटवली आहे. या चार दिवस चाललेल्या राज्य पुरस्कार चाचणी शिबिरात विद्यार्थिनींची लेखी, तोंडी तसेच प्रात्यक्षिक स्वरूपात सखोल परीक्षा घेण्यात आली. शिस्त, नेतृत्व, सेवा, स्वावलंबन, शारीरिक क्षमता, सामाजिक बांधिलकी यासह विविध अंगांनी ही चाचणी अत्यंत कठोर स्वरूपाची होती. मात्र सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी प्रत्येक टप्प्यावर आपले प्राविण्य सिद्ध करत सर्व परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केल्या आणि राज्य पुरस्कारावर आपले नाव कोरले. हा मानाचा पुरस्कार मिळवण्यासाठी विद्यार्थिनींना गाईड वटणे जयमाला यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांची शिस्तबद्धता, प्रशिक्षणामुळे विद्यार्थिनींच्या अथक परिश्रमामुळे हे यश शक्य झाले. तसेच प्रशालेचे प्राचार्य सुहास वडणे, शिक्षिका श्रीमती पिरजादे, श्रीमती सावंत तसेच सर्व शिक्षकवृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेतील या विद्यार्थिनींनी मिळाला पुरस्कार अक्षरा बालाजी मगर, स्मिता शिवाजी पवार, साक्षी सूर्याजी पवार, समीक्षा नितीन तोरमकर, मानसी मिलिंद मगर, संध्या मारुती कदम, प्रणाली विकास कदम, वैभवी कुंडलिक भाकरे व वैष्णवी शिवशांत कुंभार यांचा समावेश आहे. या विद्यार्थिनींनी आपल्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःला सिद्ध करत विद्यालयाचा आणि तामलवाडी परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त अन् देशप्रेम स्काऊट गाईड चळवळीतून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व याची जडणघडण होते. स्काऊट गाईड ही केवळ चळवळ नसून, ती विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी जागतिक मूल्यसंस्था आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशप्रेम, निसर्गप्रेम, बंधुता, कर्तव्यभावना आणि चारित्र्यनिर्मिती यांसारख्या मूल्यांचा संस्कार केला जातो.

विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वगुणसंपन्न बनवण्याचा या चळवळीचा उद्देश असतो. राज्य पुरस्कार हा स्काऊट गाईड क्षेत्रातील विद्यार्थ्यांना दिला जाणारा एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो.

# रुग्णसेवेचे नवे युग – डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात धाराशिव वैद्यकीय महाविद्यालयाचा ऐतिहासिक कायापालट




**धाराशिव ( रामेश्वर डोंगरे )** येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आज संपूर्ण जिल्ह्यासाठी केवळ उपचाराचे ठिकाण न राहता, विश्वास, गुणवत्ता आणि तत्पर सेवेचे केंद्र बनले आहे. हा बदल अचानक घडलेला नाही; तो घडला आहे प्राचार्य डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्या दूरदृष्टी, काटेकोर नियोजन आणि अथक मेहनतीमुळे. त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून संपूर्ण वैद्यकीय महाविद्यालयाचे चित्र अक्षरशः पालटले असून, रुग्णसेवेला नवी दिशा मिळाली आहे.

पूर्वी ज्या सुविधा मोठ्या शहरांकडे पाहून शोधाव्या लागत होत्या, त्या आज धाराशिवमध्येच सहज उपलब्ध आहेत. सिटीस्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, सर्व प्रकारच्या रक्ततपासण्या, लसीकरण अशा अत्यावश्यक सेवांचा लाभ आता रुग्णांना वेळेत आणि व्यवस्थित मिळत आहे. तपासणीपासून उपचारापर्यंतची साखळी इतकी सक्षम झाली आहे की रुग्णांना बाहेर धावपळ करण्याची गरज उरलेली नाही. या सुविधांचा सर्वाधिक फायदा गोरगरिब, शेतकरी आणि सामान्य नागरिकांना होत असून, आरोग्यसेवेतली दरी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

विशेषतः शस्त्रक्रियांच्या बाबतीत धाराशिव वैद्यकीय महाविद्यालयाने नवा विश्वास निर्माण केला आहे. गुडघा प्रत्यारोपणासारख्या महत्त्वाच्या शस्त्रक्रिया आता आठवड्यातून ठरावीक दिवशी बाहेरून येणाऱ्या नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत यशस्वीपणे केल्या जात आहेत. मोठ्या आणि गुंतागुंतीच्या ऑपरेशन्ससाठीही अनुभवी डॉक्टरांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली असून, उपचारांची गुणवत्ता आणि रुग्णांची सुरक्षितता यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे मोठ्या शस्त्रक्रियांसाठी बाहेर जावेच लागते ही धारणा आता इतिहासजमा होत आहे.

हृदयरोग, न्यूरो सर्जरी, ऑर्थोपेडिक्ससह विविध विभागांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता ही डॉ. चव्हाण यांच्या कार्यकाळातील महत्त्वाची बाब ठरली आहे. आवश्यक तेव्हा तज्ज्ञ मिळावेत, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, प्रशासकीय अडथळे दूर केले आणि रुग्णसेवेत कोणतीही कमतरता राहू दिली नाही. उपकरणे आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीतही त्यांनी कधीही तडजोड केली नाही. बाजारातील दर, गुणवत्ता आणि उपयुक्तता यांचा सखोल अभ्यास करूनच उपकरणे मागवली जातात; नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार सेवा मिळावी, हाच त्यामागचा एकमेव उद्देश आहे.

औषधांचा तुटवडा कधीही जाणवू नये, टेक्निशियन अनुपस्थित असले तरी सेवा बंद पडू नये, यासाठी पर्यायी व्यवस्था तात्काळ उभी करण्याची कार्यपद्धती त्यांनी विकसित केली आहे. यामुळे रुग्णालयातील कोणताही विभाग ठप्प न होता सातत्याने कार्यरत राहतो. रुग्णसेवा म्हणजेच खरी सेवा या तत्त्वावर काम करत त्यांनी संपूर्ण यंत्रणेला शिस्त, संवेदनशीलता आणि कार्यक्षमतेची जोड दिली आहे.

एकूणच, डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव वैद्यकीय महाविद्यालय आज सुपर-क्लास आरोग्यसेवेचे प्रतीक बनले आहे. ही केवळ प्रशासकीय यशोगाथा नाही, तर सामान्य रुग्णांच्या चेहऱ्यावर उमटलेल्या दिलास्याची, विश्वासाची आणि समाधानाची गोष्ट आहे. त्यांच्या कारकिर्दीत घडलेला हा बदल धाराशिवच्या आरोग्य इतिहासात सुवर्णअक्षरांनी नोंदवला जाईल, यात शंका नाही.

# मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कामगारांना ७ फेब्रुवारी रोजी भरपगारी रजा देणे बंधनकारक

धाराशिव (जिमाका) -लोकशाही व्यवस्थेत १८ वर्षावरील प्रत्येक नागरिकाचा मतदान करणे हा मूलभूत हक्क आहे. लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील तरतुदीनुसार मतदानाच्या दिवशी सर्वसामान्य मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी रजा देणे किंवा कामाच्या तासात योग्य ती सवलत देणे आवश्यक आहे. मात्र,काही निवडणुकांमध्ये काही संस्था व आस्थापना त्यांच्या कामगारांना अशी रजा किंवा सवलत देत नसल्याने अनेक मतदार मतदानापासून वंचित राहतात.ही बाब लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्ह्यात जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांमध्ये सार्वत्रिक निवडणुक होणार आहेत.या निवडणुकांमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार,अधिकारी व कर्मचारी हे कामानिमित्त निवडणूक क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी रजा देण्यात यावी. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना,कारखाने,दुकाने व इतर आस्थापना (खाजगी कंपन्यांमधील आस्थापना,सर्व दुकाने,निवासी व अनिवासी हॉटेल्स,खाद्यगृहे,नाट्यगृहे, व्यापार,औद्योगिक उपक्रम तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या,शॉपिंग सेंटर्स,मॉल्स, रिटेलर्स इत्यादी) यांना हे आदेश बंधनकारक राहतील.

अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता असलेल्या धोरणात्मक किंवा लोकोपयोगी सेवा देणाऱ्या आस्थापनांच्या संदर्भात,संबंधित अधिकारी,कर्मचारी व कामगारांना पूर्ण दिवसाची रजा देणे शक्य नसल्यास मतदानाचा हक्क बजावण्यासाठी किमान दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे आवश्यक आहे. ही सवलत देण्याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे बंधनकारक आहे.

उद्योग,ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना,कारखाने व दुकाने यांचे मालक व व्यवस्थापन यांनी वरील सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे शासनाने निर्देश दिले आहे.

मतदारांकडून मतदानासाठी आवश्यक रजा किंवा सवलत न मिळाल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा इशाराही शासनाने दिला आहे.

या आदेशामुळे येत्या निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराला निर्भयपणे व निर्बंधांशिवाय आपला मतदानाचा हक्क बजावता येणार असून लोकशाही अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

# भाविकांनी दोन किलोमीटर झाडली देवीची वाट; दर्शनासाठी दिवसभर रांगा



अणदूर (प्रतिनिधी)-प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी मंगळवारी (दि. ३) चिवरी महालक्ष्मी देवीची 'कायरं' यात्रा हजारोंच्या उपस्थितीत आई राजा उदो उदोच्या गजरात हजारो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. देवीचे भक्त पोतराजांनी हलगीच्या तालावर आईचा जयघोष करत नृत्य केले. राज्यासह कर्नाटकातूनही भाविक दर्शनासाठी आले होते.

कायरं यात्रेनिमित्त मंगळवारी पहाटे चिवरी गावातील माता-भगिनींनी चिवरी ते लक्ष्मी मंदिर हा आईचा रस्ता झाडून स्वच्छ केला. त्यानंतर आरती करून दर्शन घेतले. पहाटे लक्ष्मी आईची पूजा झाल्यानंतर यात्रेस सुरुवात झाली. दिवसभर नवस सायास फेडत भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. सायंकाळी गावातून वाजत गाजत दिवा, दुरडी, आंबट भात मंदिरात नेण्यात आला. त्यानंतर रंग भरणाचा कार्यक्रम झाला. यात्रेत वीज, पाणी याची देवस्थान ट्रस्टने उत्तम नियोजन केले होते. तर नळदुर्ग पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. बुधवारी(दि.४) पहाटे बली देण्याचा व घाव घेण्याचा कार्यक्रम होईल. सकाळी दहाच्या सुमारास देवीच्या मंदिरासमोरील न्हाणी घरात दिवे लावून नैवेद्य दाखवण्यात येणार आहे.

मानकऱ्यांनी गावाच्या वेशीत लावला दिवा अन् दिला आंबट भाताचा प्रसाद चिवरी येथील मानकरी अनिल गायकवाड व बनसोडे कुटुंबाकडून मंगळवारी सायंकाळी ६ वाजता वाजत गाजत गावच्या वेशीत दिवा आणला. त्याचवेळी प्रथेप्रमाणे रावसाहेब पाटील व विवेकानंद पाटील यांच्या घरातून एका दुरडीत आंबट भात आणल्यानंतर त्यावर दिवे ठेवून तो शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आई लक्ष्मीचा जयजयकार करीत सवाद्य आंबट भात व दिवा रात्री आठ वाजेच्या सुमारास मंदिरात नेण्यात आला. यावेळी भाविकांची मोठी गर्दी होती.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# मोफत वंध्यत्व तपासणी व सल्ला शिबिराचे आयोजन

धाराशिव :- अक्षय हॉस्पिटल व राजगुरू आय.व्ही.एफ. सेंटर, धाराशिव यांच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच धाराशिव रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नि:संतान जोडप्यांसाठी मोफत वंध्यत्व तपासणी व सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर शुक्रवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार असून, शिबिराचे स्थळ अक्षय हॉस्पिटल व राजगुरू आय.व्ही.एफ. सेंटर, सांजा रोड, धाराशिव येथे असणार आहे.

दरवर्षी अक्षय हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात येते. आतापर्यंत या शिबिरांचा हजारो नि:संतान जोडप्यांनी लाभ घेतलेला आहे. या शिबिरामध्ये नि:संतान जोडप्यांसाठी मोफत तज्ज्ञ सल्ला तसेच वंध्यत्व तपासणी करण्यात येणार आहे.

या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे गरजेप्रमाणे कॉम्प्युटरद्वारे शुक्राणू तपासणी, महिलांसाठी मोफत सोनोग्राफी करण्यात येणार आहे. या शिबिरात कोणत्या जोडप्यांनी सहभाग नोंदवावा?

महिलांसाठी : लग्नानंतर दीड ते दोन वर्षे होऊनही गर्भधारणा होत नसेल तर, गर्भनलिकेमध्ये अडथळा किंवा गर्भनलिका बंद असणे,

स्त्रीबीज तयार न होणे, अनियमित मासिक पाळी, पिसीओडी असणाऱ्या स्त्रिया, तीन ते चार वेळा खणख करूनही गर्भधारणा न होणे, अगोदर खतऋ करूनही गर्भधारणा झालेली नसल्यास

पुरुषांसाठी : शुक्राणूंची संख्या कमी असणे, शुक्राणूंची क्टिव्हिटी कमी असणे, खराब गुणवत्तेचे शुक्राणू, वीर्यामध्ये शुक्राणू नसणेआणि दोघांचेही सर्व रिपोर्ट नॉर्मल असूनही गर्भधारणा होत नसेल तर. वरील समस्या असलेल्या नि:संतान जोडप्यांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरात भाग घेण्यासाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी प्रत्यक्ष हॉस्पिटल मध्ये अथवा ७३१७३१२७७७ या मोबाईल नंबर वर करता येईल.

# स्फोटात कारखानदाराचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी तालुक्यातील तेरखेडा हे गाव मराठवाड्याची शिवकाशी म्हणून ओळखले जाते. येथे मोठ्या प्रमाणावर फटाके तयार केले जातात. मात्र, या उद्योगामागील भयानक वास्तव म्हणजे येथील कारखान्यांतील कामगारांची सुरक्षितता ही पूर्णपणे दुर्लक्षित असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. या घटनेची समजलेली माहिती अशी की, दि. ३१ जानेवारी रोजी खामकरवाडी शिवारातील एका फायर वर्क्स या कारखान्यात अचानक स्फोट झाला. या स्फोटात कारखानदाराचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यादिवशी तेरखेडा येथे आठवडी बाजार असल्याने कारखान्यास सुट्टी होती, हीच बाब अनेक मजुरांचे प्राण वाचवणारी ठरली.मात्र, ही पहिलीच घटना नाही. गेल्या वर्षी १ फेब्रुवारी २०२५ रोजी बाबा फायर वर्क्स कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात आठ मजूर गंभीररित्या भाजले गेले होते. त्यापैकी एका मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या घटनेनंतर काही दिवस प्रशासन खडबडून जागे झाले, चौकशीचे नाट्य झाले; परंतु कालांतराने सर्व काही जैसे थे झाले.तेरखेडा परिसरात सध्या सुमारे ३० फटाका कारखाने कार्यरत असून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. या उद्योगामुळे स्थानिक मजुरांना रोजगार मिळत असला तरी त्यांच्या जीवाची किंमत मात्र नगण्य ठरत असल्याचे चित्र आहे.

आवश्यक सुरक्षा साधने, प्रशिक्षण, अग्निशमन यंत्रणा आणि नियमांची अंमलबजावणी याकडे कारखानदार व प्रशासन दोघेही डोळेझाक करत असल्याचा आरोप सुज्ञ नागरिकांकडून केला जात आहे. स्फोट झाल्यानंतरच प्रशासन जागे होते, थातूरमातूर कारवाई केली जाते आणि पुन्हा सर्व काही पूर्ववत सुरू होते, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी किमान महिन्यातून एक ते दोन वेळा तरी कारखान्यांची तपासणी करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पांडुरंग रा. ढेकरी ता. तुळजापूर जि. धाराशिव, तुषार रा. ढेकरी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०२.०२.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे वाहने बसस्थानक तुळजापूर येथे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये तुळजापूर पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649